जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर शहरामधील सर्जेपुरा येथील धोकादायक इमारत उतरवण्याचे काम सुरू


## धोकादायक इमारती मालकांनी स्वतःहून काढून घ्याव्यात, अन्यथा कारवाई

नगर – महानगरपालिका प्रशासनाने शहरातील १५ अतीधोकादायक अवस्थेतील इमारती पडण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. यात बहुतांश इमारती या मध्य शहरातील आहेत व त्यातील काहींचा वापरही सुरू आहे. या इमारती उतरवून घेण्याचे आदेश बांधकाम विभागाला दिले आहेत. सर्जेपुरा परिसरातील एका धोकादायक इमारतीचा धोकादायक भाग उतरवून घेण्यात येत आहे. नागरिकांनी धोकादायक अवस्थेतील इमारती स्वतःहून काढून घ्याव्यात, अन्यथा महानगरपालिका कारवाई करून काढतील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

धोकादायक अवस्थेत असलेल्या शहरातील १९७ इमारतींना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच, १६ धोकादायक इमारतींबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. तर, १५ इमारती अती धोकादायक अवस्थेत आहेत. या धोकादायक इमारतींवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. सर्जेपुरा गल्ली येथील धोकादायक इमारत उतरवण्याचे काम सुरू करण्यात आले असून दोन दिवसांमध्ये महाजन गल्ली येथील धोकादायक इमारत हटवण्याचे काम सुरू करण्यात येणार असून. इतर इमारत मालकांनाही स्वतःहून इमारती काढून घेण्याचे आवाहन आले आहे. तसेच, १९७ इमारतींना नोटिसा बजावून त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे व अहवाल सादर करण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. या इमारत मालकांनाही दुरुस्ती अथवा धोकादायक भाग उतरवून घेण्यासाठी सूचना द्याव्यात, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.


सर्जेपुरा परिसरातील एका धोकादायक इमारतीचा धोकादायक भाग उतरवून घेण्यात येत आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### भारतास फायदेशीर ... चागोस द्वीपसमूह

चागोस द्वीपसमूह मध्य हिंद महासागरात असणाऱ्या ६० हून अधिक लहान बेटांचा समूह आहे. १९६० च्या दशकात ब्रिटनने मॉरिशसला स्वातंत्र्य देण्याच्या आधीच हा द्वीपसमूह वेगळा करुन स्वत:कडे ठेवला होता. यातील सर्वात मोठा बेट 'डिएगो गार्सिया' अमेरिकेला लीजवर देण्यात आले होते. तिथे एक अत्यंत संवेदनशील लष्करी तळ स्थापला आहे.

या बेटावरील नैतिक व सामरिकदृष्ट्या फायद्याच्या दृष्टीने भारताने आंतरराष्ट्रीय न्यायालय व संयुक्त राष्ट्र संघांसह मॉरिशसला पाठींबा दिला आहे.

भारत व मॉरिशस यांचे संबंध आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी व राजनैतिक पातळ्यांवर चांगले व सुदृढ आहेत. तेथील सुमरे ७०% लोक भारतीय वंशाचे आहेत.

२०१५ मध्ये भारताने उगालेगा बेटावर धावपट्टी आणि इतर लष्करी पायाभूत सुविधांची उभारणी केली. हे बेट हिंद महासागरातील प्रमुख जलमार्गावर लक्ष्य ठेवण्यास भारताला उपयुक्त ठरू शकतात.

ब्रिटनने चागोस द्वीप समूहावरील सार्वभौमत्त्व मॉरिशसला हस्तांतरित करण्याचा निर्णय नुकताच घेतला. या निर्णयाने एका ऐतिहासिक स्वातंत्र्याची नीट झाली आहे. भारताच्या दृष्टीने पाहिल्यास हा केवळ निर्वसाहतीकरणाचे उदाहरण नाही तर हिंदी महासागराच्या क्षेत्रातील सामरिक लढ्याच्या दृष्टीनेही हा निर्णय भारतासाठी उपकारक ठरणार आहे.

भारत आणि चीन यांच्यातील संघर्ष व स्पर्धामध्ये चावोस एक वेगळे स्थान राखून आहे.

आपला देश विकसनशीलतेतून विकसित होत असताना चीन, अमेरिका वा काही देशांना त्रास वाटणे साहजिक आहे. त्यात पाकिस्तान, बांग्लादेशसारख्या देशांना मदत करुन ते आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करणार. म्हणूनच सामरिकदृष्ट्या मॉरिशसचा चागोस द्वीपसमूह आपणास अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

# काळ्या बाजारात जाणारा रेशनिंगचा तांदूळ पकडला

## ३० लाखांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – राज्य सरकारच्या रेशनिंग योजनेतील स्वस्त धान्य असलेला शासकीय तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असलेला ट्रक स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामखेडमध्ये पकडला असून, ४०० गोण्या तांदुळासह ३० लाख रूपये किमतीचा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी एकास ताब्यात घेतले असून, मुख्य संशयित आरोपी पसार आहे.


काळ्या बाजारात जाणारा रेशनिंगचा तांदूळ पकडल्यानंतर मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलीस अधीक्षक सोम नाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विश्वास बेरड, बिरप्पा करमल, हृदय घोडके, रोहित मिसाळ आणि भगवान धुळे यांचे पथक २६ जून रोजी जामखेड पोलीस ठाण्यात अवैध धंद्यांची माहिती काढत असताना जामखेड ते करमाळा रस्त्याने शासकीय रेशनचा तांदूळ घेऊन एक ट्रक सांगलीकडे जाणार आहे, अशी माहिती मिळाली. त्यानुसार, जामखेड येथील आयटीआय परिसरात सापळा रचण्यात आला. संशयित ट्रक (एमएच १७ बीडी ८१०२) अडवून तपासणी केली असता त्यामध्ये ४०० गोण्यांमध्ये भरलेला तांदूळ आढळून आला.

चालकास विचारणा केली असता त्याने आपले नाव सुंदर बबन घुमरे (वय ६०, रा. लोणी, ता. जामखेड) असे सांगितले. ट्रकमधील तांदूळ हा रेशन योजनेतील असून तो जामखेड येथील योगेश मोहन भंडारी याच्या दुकानातून घेऊन सांगली येथे विक्रीसाठी जात असल्याची कबुली त्याने दिली. या कारवाईत एकूण ४०० गोण्या तांदळ आणि ट्रक असा एकूण ३० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जामखेड पोलीस ठाण्यात जिवनावश्यक वस्तू अधिनियम कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केडगाव परिसरामध्ये गोमांस वाहतूक करणाऱ्या पिकअपसह ३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – बेकायदेशीररित्या गोवंशीय जनावरांची कत्तल करुन, गोमांसची वाहतूक करणारा पिकअप कोतवाली पोलिसांनी पकडला असून ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई नगर–पुणे रोडवरील केडगाव बायपास येथे २६ जून रोजी दुपारी साडेबारा वाजता करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की, कोतवाली पोलीस ठाण्याचे कर्मचारी केडगाव बायपास मार्गावर वाहतूक नियमन करीत असताना पुणे रोडकडून एक पांढऱ्या रंगाचा बोलेरो पिकअप (क्र. एम एच १२ एस एफ ८७६८) संशयास्पद रीतीने येताना आढळला. पोलिसांनी पिकअप थांबवून चालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी पिकअपच्या पाठीमागील हौदाची तपासणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गोवंशीय जनावरांचे मांस आढळून आले. पोलिसांनी पिकअप चालक शफीक अली खान रफीक अली खान (वय ३६, रा. क्रांतीचौक, समतानगर, छत्रपती संभाजीनगर) यास ताब्यात घेतले. टेम्पोतील २० हजार रुपये किमतीचे १०० किलो गोमांस, ३ लाख रुपये किमतीचा बोलेरो पिकअप असा एकूण ३ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शफिक खान याच्याविरुद्ध भा.न्या.सं. २०२३ चे कलम २७१, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (क), ९ (अ),मोटार वाहन कायदा कलम ६६ (१), १९२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस हवालदार संतोष लगड करीत आहेत.

# एमआयडीसी परिसरातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर 'मोक्का'

## १९ जणांचा समावेश, टोळीवर २४ गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत दाखल

नगर – एमआयडीसी परिसरात दहशत करणार्या संतोष धोत्रे टोळीविरोधात अखेर 'मोक्का' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावाला नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी मंजूरी दिली आहे. यामुळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात 'मोक्का'चे कलम वाढविण्यात आले आहे.

उसणे पैसे न दिल्याच्या कारणावरून संतोष धोत्रे व त्याच्या टोळीने निंबळक येथील व्यावसायिकावर खूनी हल्ला केला होता. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. पोलिसांच्या तपासात संशयित आरोपींचा गुन्हेगारी इतिहास उघडकीस आला. त्यांच्यावर पूर्वीपासूनच खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, महिलांवर अत्याचार, शस्त्र बाळगणे, जबरी चोरी यांसारखे तब्बल २४ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांच्याविरूध्द 'मोक्का' कलमान्वये कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक घार्गे यांच्या आदेशाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी प्रस्ताव तयार करून विशेष पोलीस महानिरीक्षक कराळे यांच्याकडे सादर केला होता. त्यांनी 'मोक्का' अंतर्गत वाढीव कलम लावण्यास मंजूर दिली आहे.

टोळी प्रमुख संतोष रघुनाथ धोत्रे (वय २७ रा. चैतन्य हॉटेल पाठीमागे, गुंदेचा हाऊस, नागापुर), टोळी सदस्य मट्टस ऊर्फ अजय सोमनाथ गुळवे (वय २६, रा. लामखेडे पेट्रोल पंपाशेजारी, वैष्णवी हॉटेल, एमआयडीसी), अमोल गोरख आव्हाड (वय २३ रा. आर्दश कॉलनी, काकासाहेब म्हस्के रस्ता, बोल्हेगाव, एमआयडीसी), अभि उर्फ अभिषेक नितीन गायकवाड (वय २० रा. नागापुर), विशाल भाऊसाहेब पाटोळे (वय २३, रा. गणेश चौक, बोल्हेगाव), सुधीर प्रदीप दळवी (वय २४, रा. दावल मलीक चौक, नागापुर), आबा ऊर्फ राहुल नाथा गोरे (वय ३५, रा. चक्रधर स्वामी मंदीराजवळ, नागापुर), शरद जगन पाटोळे (वय २२ रा. चक्रधर स्वामी मंदीरा मागे, नागापुर), तुषार लहानु पानसरे (वय १९, रा. वडगाव रस्ता, साईराज नगर, वडगाव गुप्ता, ता. अहिल्यानगर), अक्षय बाळासाहेब ठुबे (वय २१, रा. सन फार्मा शाळेजवळ, आंबेडकर चौक, एमआयडीसी), यश सुनील सरोदे ऊर्फ प्रेम (वय १८, रा. चक्रधर स्वामी मंदीराजवळ, नागापुर), सुरज अरविंद भिगांरदिवे उर्फ खंड्ड (वय २१, रा. सेन्ट मेरी चर्च समोर, नागापुर), करण गौतम आवताडे (वय २१, रा. आर्दश कॉलनी, काकासाहेब म्हस्के रस्ता, बोल्हेगाव), आशिष ऊर्फ पप्पु अंतोन पाटोळे (वय २१, रा. आंबेडकर चौक, नागापुर), यश भगवान बुट्टे (वय २१, रा. आंबेडकर चौक, नागापूर), शेख मोहम्मद ताहीर मुन्ना (वय २१, रा. कसबे वस्ती, सावेडी), जॅकी ऊर्फ धिरज आवारे, अदित्य लक्ष्मण जाचक व प्रतिक नवनाथ तागड यांच्याविरूध्द 'मोक्का' कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे.

# चौथ्या दिवशी जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण सुरू

नगर – जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागमध्ये सन २०२५ च्या जिल्हा अंतर्गत शिक्षक बदलीतील संवर्ग एक मध्ये बदली प्रक्रियेमध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी व तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून खोटे अपंग, खोट्या घटस्फोटीत व खोट्या परितक्त्याची कोणतीही तपासणी न करता फक्त खोट्या दाखल्यावर त्यांना संवर्ग एक मधून बदली प्रक्रियेमध्ये समाविष्ट केल्या असल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांचे जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण सुरू करून चौथ्या दिवशी आंदोलनाची दखल घेतली नसुन उपोषण सुरू करण्यात आले आहे.


जिल्हा परिषदेच्या आवारात चौथ्या दिवशी आमरण उपोषण सुरू करण्यात आले.

यावेळी विजय शिरसाठ, स्वप्निल साठे, विशाल भिंगारदिवे, अॅड. अशोक पालवे, अजय बडोदे, ऋषिकेश खुडे, अॅड. रामदास आडगले, रवी गव्हाणे, योगेश भालेराव, दत्ता, तुकाराम कोटकर, रोहित आढाव, गौरव नरवडे, अल्हाट सर, संदीप वाकचौरे, अमोल इंगळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती पर्वानिमित्त जिल्हा पडताळणी समितीच्यावतीने ४ जुलैपर्यंत जात वैधता प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

नगर – राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती पर्वानिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने २६ जून ते ४ जुलै या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या तसेच सीईटी परीक्षा दिलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सहजतेने मिळावे, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयांतील विज्ञान शाखेतील विद्यार्थी व डिप्लोमा अभ्यासक्रमातील तृतीय वर्षाच्या प्रवेशितांची जात पडताळणी प्रकरणे तालुका व महाविद्यालयनिहाय संख्यात्मक स्वरूपात संकलित केली जाणार आहेत. ही माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय स्तरावर गोळा करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज भरून घेण्याचे नियोजन असून अर्जातील त्रुटींची दुरुस्ती व मार्गदर्शनासाठी वेबिनारचे आयोजन करण्यात येणार आहे. या वेबिनारमधून महाविद्यालयातील प्राचार्य व संबंधित प्रशासनास कार्यपद्धती, आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात येईल.

त्रुटी दुरुस्ती मोहिम २७ जून ते ३ जुलैदरम्यान : जयंती पर्व कालावधीत २७ जून ते ३ जुलै दरम्यान, जात पडताळणी समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत त्रुटी दुरुस्ती मोहीम राबविण्यात येणार आहे. विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेले तसेच सीईटी परीक्षा दिलेले विद्यार्थी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज पूर्ण करून सादर करावेत, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

महाविद्यालयांना सूचना व आवाहन : सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची माहिती १५– नमुन्यावर शिफारस करून महाविद्यालयांनी सूचना फलकावर मोहिमेसंदर्भातील माहिती प्रसिद्ध करावी. त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करून, समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयातच जमा करून घेण्याचे निर्देशही समितीने दिले आहेत.

विद्यार्थ्यांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन आपल्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया वेळेत पूर्ण करून प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


पोखर्डी शिवारात वास्तव्य करणाऱ्या ३ बांगलादेशी नागरिकांना पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत एमआयडी पोलिस पथक.

# ३ बांगलादेशी घुसखोरांना पोलिसांनी नगरजवळ पकडले

(पान १ वरुन)

त्यांना भारतात येण्याबाबत काही व्हिजा अथवा काही परवानगी असल्याबाबत विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांचेकडे कुठलीही परवानगी अथवा परवानगीची कागदपत्रे मळुन आली नाही. त्यांचेकडे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, व इतर बनावट कागदपत्रे मिळुन आली असुन ती जप्त करण्यात आली आहे. सदर बांगलादेशी नागरीकांवर एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई स.पो.नि. माणिक बी. चौधरी,पोलिस उपनिरीक्षक मनोज मोंढे, स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. राजु सुद्रीक, पो. कॉ. किशोर जाधव, सुरज देशमुख, जयशिंग शिंदे, शेरकर, दहिफळे, मोबाईल सेलचे पो.कॉ. राहुल गुंडू यांचे पथकाने केली आहे. तसेच सदर कारवाई मध्ये सदन कमांड मिलेट्री इन्टेलिजन्स अहिल्यानगर यांची मदत घेण्यात आली.

# कारची काच फोडून वॉटर एटीएम युनिटसह रोख रकमेची चोरी

नगर – रस्त्याच्या कडेला लावलेल्या चारचाकी वाहनाची काच फोडून अज्ञात चोरट्याने आतील वॉटर एटीएम युनिट मशीन व रोख रक्कम असा २२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना भिंगार परिसरातील माधवबाग येथील जय भवानी कॉलनी मध्ये २४ जून रोजी रात्री १० ते २५ जून रोजी सकाळी ७.१५ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ओमकार संतोष गौडार (वय २५, मूळ रा. आगडगाव शिवार, जत्रा हॉटेलजवळ, नाशिक, हल्ली रा. जय भवानी कॉलनी, माधवबाग, नागरदेवळे, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची टाटा इंट्रा व्ही ३० ही चारचाकी (क्र. एम एच १५ एच एच ८९८५) गाडी रात्री घरासमोर रस्त्याच्या कडेला लावलेली असताना अज्ञात इसमाने कारची काच फोडून आतील सोळा हजार रुपये किमतीचे पाणी फिल्टर रिचार्ज युनिट मशीन व मशीनमधील सहा हजार रुपये असा २२ हजार रुपयाचा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ओमकार गौडार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५(अ), ३३१ (४), ३२४ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार व्ही आर गारुडकर हे करीत आहेत.

# भुतकरवाडी उपनगरातील एटीएम फोडण्याचा प्रयत्न

नगर – एटीएमच्या मेन दरवाज्याचे लॉक तोडून, अज्ञात चोरट्याने आतील एटीएम मशीनचे डिजिटल लॉक तोडून आतील कॅमेऱ्याची वायर तोडून एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न केल्याची घटना सावेडी उपनगरातील भुतकरवाडी येथील खंडेलवाल हॉस्पिटल जवळ २५ जून रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात इंडिया वन एटीएम फ्रँचायसीचे अरिफ मैगतुद्दीन खिलजी (वय ५०, रा. गजानन कॉलनी, नवनागापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की इंडिया वन एटीएम फ्रँचायसी कंपनीचे एटीएम मशीन सावेडी येथील भुतकरवाडी खंडेलवाल हॉस्पिटल जवळ येथे आहे. या एटीएमचे मेन गेटचे लॉक अज्ञात चोरट्याने कशाचेतरी सहाय्याने तोडून वाकडे तिकडे करुन एटीएम मशीनचे डिजिटल लॉक तोडले. एटीएम मशीनचेवर लावलेल्या कॅमेऱ्याची वायर तोडून नुकसान केले. परंतु चोरट्यास एटीएम मशीनच्या आयडी कोडशिवाय मशीन फोडता न आल्याने त्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. ही घटना २६ जून रोजी सकाळी निदर्शनास आली.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी आरिफ खिलजी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध बी एन एस कलम ३०३, (२), ६२, ३२४ (२) (३) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

पुढील तपास सहाय्यक फौजदार गोपीनाथ गोरडे हे करीत आहेत

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर हे पडेल महागात

बऱ्याचदा आपण कामात व्यस्त असल्याने लघवी करणे पुढे ढकलतो. तुम्हाला वाटेल की एक-दोनदा लघवी रोखून ठेवणे ही मोठी गोष्ट नाही, परंतु प्रत्यक्षात या छोट्या सवयी तुमच्या शरीराला गंभीर नुकसान करू शकतात. होय, लघवी रोखून ठेवल्याने अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. लघवी जास्त वेळ रोखून ठेवल्याने लघवी उलट होते, ज्यामुळे मूत्राशयात जळजळ आणि संसर्ग होण्याचा धोका वाढतो. मूत्राशयाचा संसर्ग गंभीर असू शकतो, तो प्रजनन क्षमता कमकुवत करू शकतो. कधीकधी येथील स्नायू देखील कमकुवत होतात इतरही अनेक समस्या उद्भवू शकतात. यासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी एकदा लघवी करा. जर तुम्ही अशा ठिकाणी जात असाल जिथे तुम्हाला शौचालय शोधणे कठीण जाऊ शकते, तर घराबाहेर पडण्यापूर्वी एकदा लघवी करायला विसरू नका. योग्य प्रमाणात पाणी प्या, जेणेकरून हायड्रेशन टिकून राहील पण लघवी वारंवार ओव्हरफ्लो होणार नाही.

## पाककला

### फ्रुट कस्टर्ड

**साहित्य :** १ लिटर दूध, १ वाटी हिरवी द्राक्ष, १ वाटी काळी द्राक्ष, १ सफरचंद, २ केळ, १ वाटी डाळिंबाचे दाणे, २ ते तीन टेबलस्पून कस्टर्ड पावडर, १ वाटी साखर, वेलची पूड,

**कृती :** सर्वप्रथम दूध गरम करावे आणि त्यामध्येच साखर टाकून साखर विरघळून घ्यावी दूध गरम झाल्यानंतर एका वाटीमध्ये वेगळे दूध काढून त्यात कस्टर्ड पावडर घालून ती विरघळवून घ्यावी. विरघळलेली कस्टर्ड पावडर गरम दुधात ओतून ते दूध हलवत राहावे म्हणजे त्याला एक घट्टपणा येतो तसेच त्यात वेलची पूड घालून घ्यावी घट्टपणा यायला लागल्यानंतर दूध बंद करावे. आता फ्रुट सॅलड मध्ये घालणारे फ्रुट्स जे उपलब्ध आहेत ते घ्यावेत त्याचे काप करून घ्यावेत आणि दूध थंड झाल्यानंतर त्यामध्ये ते सगळे फ्रुट्स घालून घ्यावेत यात तुम्ही ड्रायफ्रूट्स ही घालू शकता त्यानंतर हे सर्व मिश्रण फ्रीजमध्ये थंड होण्यासाठी ठेवावे फ्रुट सॅलड हे फ्रुट कस्टर्ड किंवा फ्रुट सॅलड हे थंडच खाण्यास छान लागते.

## वास्तू

* घरामध्ये जाळे कधीही होऊन देऊ नका, अन्यथा जाळे नशीबावर लागतात आणि कामात अडथळे येतात.

* मंदिरात धूप, अगरबत्ती आणि हवन कुंड दक्षिण दिशेला आग्नेय कोपऱ्यात ठेवावी.

* नेहमी गाईसाठी पहिली चपाती भाकरी काढा. यामुळे देव-देवता प्रसन्न तर होतातच त्याच सोबत पितरांनाही शांती मिळते.

* दुर्वा दररोज गणपतीला अर्पण करा याने सुखसमृद्धी येईल. त्याचप्रमाणे दुर्वांचे झाड घरात लावल्याने संततीची प्राप्ती होते.

## सल्ला

काचेच्या वस्तूंचा पिवळटपणा घालविण्यासाठी एका भांड्यात कोमट पाणी घ्या त्यामध्ये १ चमचा कोलगेटची पेस्ट टाकून मिक्स करा स्पंजच्या मदतीने हे काचेचे भांडे घासून घ्या. भांडी चकाचक दिसतील.

## सौंदर्य

नेहमी कोरडे केस ठेवल्याने केसांच्या मुळांपर्यंत पोषण पोहोचत नाही त्यामुळे आठवड्यातून एकदा केसांना खोबरेल तेल लावावे.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २८ जून २०२५

**विनायक चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पुष्य ०६।३६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** तुम्ही तुमच्या पालकांना धार्मिक स्थळी घेऊन जाऊ शकता ज्यामुळे त्यांना आनंद होईल. आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित राहणार आहे.

**वृषभ :** कौटुंबिक सदस्यांना मदत कराल. जोडीदाराकडून खूप पाठिंबा मिळेल. इतरांच्या कामामध्ये दखल देणे समस्या निर्माण करू शकते.

**मिथुन :** पैशांच्या व्यवहारात काळजी घ्या. आजचा दिवस तुमच्यासाठी मध्यम फलदायी ठरणार आहे. प्रलंबित असेल तर ते पूर्ण होऊ शकते.

**कर्क :** जर तुमचे कोणतेही काम बराच काळ प्रलंबित असेल तर आज तुम्हाला त्याकडे लक्ष द्यावे लागेल. भविष्यातील काही योजनांमध्ये पैसे गुंतवू शकता.

**सिंह :** जर तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आज तुमची इच्छा पूर्ण होईल.

**कन्या :** आज तुम्हाला तुमच्या खाण्यापिण्याकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आरोग्य बिघडू शकते.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. तुम्ही सामाजिक कार्यातही पूर्ण रस दाखवाल.

**वृश्चिक :** मालमत्ता खरेदी करताना समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला नवीन काम सुरू करण्याची संधी मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी खर्चिक राहणार आहे.

**धनु :** तरुणांना त्यांचे करिअर सुधारण्याची संधी मिळेल. भविष्यासाठी गुंतवणूक कराल. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल राहणार आहे.

**मकर :** तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून खूप पाठिंबा आणि सहवास मिळत असल्याचे दिसून येते. जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी ऐकायला मिळू शकते.


**कुंभ :** महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात थोडा वेळ घालवाल. नोकरीच्या माध्यमातून फिरायला जाण्याची संधी मिळेल.

**मीन :** कामाच्या ठिकाणी तुमचे काही विरोधक तुमच्यावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतील जे तुम्हाला टाळावे लागेल.

**संकलक : अ‍ॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२०८


सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) बेताल; आवश्यकतेपेक्षा जास्त ४) आयात होणाऱ्या मालावरील कर ७) हिरा ९) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात १०) दोष असलेले; भेसळयुक्त ११) गावंढळ; रानटी; जंगली १२) भाजीचा एक लालसर कंद १४) वचक; धाक; दरारा १७) एक धान्य १८) गोमंतकातील एक प्रसिद्ध देवता २०) करुणा; कृपा; मेहेरबानगी २१) पाढ्यातील सहाची संज्ञा २२) ख्रिश्चन धर्मप्रचारिका २३) प्रशंसा; स्तुती

**उभे शब्द :-** १) वाचाळ; वाचीवीर २) जाणकार; ज्ञानी ३) पंख; दुसरा ५) करंजीसारखा एक खाद्यपदार्थ ६) गोणपाटाचा तुकडा; ताटूक ८) निश्चय; ठराव; ॲग्रिमेंट १३) जुलमी; श्रेष्ठ; खंबीर १४) जहाज; नाव; होडी १५) काठचा प्रदेश; कानाची कड १६) टोळी; चमू १९) हुंगण्याचा एक पदार्थ; तपकीर

**शब्दगंध क्र. ७२०७ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. ११९४ चे उत्तर**



# मुलांचे विश्व

: संकलक : अ‍ॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आपल्या डोळ्यांना जे चुकीचे करताना दिसतंय ते बरोबर करण्याचा नेहमी प्रयत्न करावा भले ते कर्म असो वा कार्य.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मानवी शरीरातील अवयवांची काय किंमत आहे?

हृदयाबद्दल काय बोलावं मंडळी? जोवर हृदयाचे ठोके चालू, तोवर जीवनाचे चक्र चालू! एकदा का हे ठोके बंद पडले म्हणजे संपलं सगळं. मग अशा या हृदयाची किंमत किती महाग असेल याचा विचारच करायला नको. तर हृदयाची काळ्याबाजारात किंमत आहे सुमारे ८० लाख रुपये. आजकाल टक्कल ठेवायची फॅशन असली तरी केसांचं महत्त्व काही कमी नाही. ज्यांना केस नाहीत त्यांच्याइतकं केसांचं महत्त्व दुसऱ्या कुणाला कळणार नाही. अशा या केसांची किंमत असते १० इंचाला साडेचार हजार रुपये.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान हे आपण नेहमीच वाचतो. आणि ते खरंच आहे मित्रांनो. आजच्या धावपळीच्या जगात अपघातांचं प्रमाण वाढलंय आणि त्यामुळं रक्ताची गरजसुद्धा. रक्ताची एक पिशवी काळ्याबाजारात १७०० ते २२,००० रुपयांना मिळते. रक्तगट जेवढा दुर्मिळ, तेवढी तुमच्या रक्ताची किंमत जास्त!! म्हणून रक्तदान करताना नेहमी अधिकृत ठिकाणी करा आणि आवर्जून रक्तदान करा.

बोनमॅरो हा शरीरातला महत्वाचा भाग आहे. हाडांच्या पोकळीत असलेल्या उती म्हणजे टिश्यूजना आपण बोनमॅरो म्हणतो. मांसाहारी लोक नळी फोडून आतलं जे खातात ते हेच! नवीन रक्तपेशी बनवणं, नवीन हाड, चरबी आणि कूर्चा म्हणजेच कार्टिलेज बनवण्यासाठी बोनमॅरो शरीरात असणं आवश्यक असतं. एक ग्रॅम बोनमॅरोची बाजारात किंमत आहे तब्बल १६ लाख रुपये.

कुणी गरीबीला कंटाळून किडनी विकायला निघाले, पेंडिक्स सांगून किडनीच काढली अशा घटना आपण नेहमी वाचतो. त्याचं एक कारण असं आहे की शरीरात दोन किडन्या असतात आणि एकीवर आपलं काम चालू शकतं, आणि दुसरं म्हणजे किडनीला बाजारात मिळत असलेला भाव!! जिवंत माणसाच्या एका किडनीला सव्वा ते दीड कोटीचा भाव मिळतो, तर मेलेल्या माणसाच्या किडनीला जवळपास दहा लाख ते दीड कोटी असा भाव मिळतो. पुन्हा एकदा रक्तगट, त्यामुळं किडनी जुळणं वगैरे भानगडी असतात. जेवढं दुर्मिळ तेवढं महाग हे सूत्र आहेच.

लिव्हर म्हणजेच यकृत शरीरातली सर्वात मोठी ग्रंथी आहे. यकृत पित्ताची निर्मिती करतं. लिव्हर खराब झाल्यास बेवडे मरतात हे तर आपल्याला माहित आहेच. तर लिव्हरची किंमत असते साधारण १ कोटी रुपये. बुब्बुळ डोळ्यातला महत्वाचा भाग असतो आणि म्हणून खूप महागसुद्धा आहे. बुब्बुळांची एक जोडी जवळपास एक लाखात विकली जाते. पांच इंद्रियांमधील एक म्हणजे त्वचा! या १ इंच त्वचेची किंमत आहे, १५ ते २० हजार रुपये. प्लास्टिक सर्जरी वगैरेंसारख्या गोष्टीत ती लागतेच. स्काल्प म्हणजे आपली टाळू विकली जाते साधारण ५० हजार रुपयांना. कवटी पण विकली जाते? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. हो, कवटी विकली जाते साधारण ८५ हजार रुपयांना.

किती महाग अवयव आपल्याला फुकटात मिळाले आहेत! आपल्याला याचं महत्व कळायला पाहीजे. जर एकेक अवयव इतके महाग आहेत, तर पुर्ण आयुष्य किती अनमोल असेल याचा विचार करा. जीवन अमूल्य आहे आणि म्हणूनच जीवनावर प्रेम करा.

### नंदीकेश्वर

राजा जनमेजयाने वैशंपायन ऋषींना विचारले, नंदी या साधारण पशूच्या अंगी एवढी विलक्षण शक्ती कोठून आली? तसेच शंकराचे ते वाहन कसे झाले? यावर वैशंपायन ऋषी म्हणाले, शिरवी नावाचा एक महान तपस्वी ऋषी होता. तो एके दिवशी इंद्राला भेटायला गेला असता त्याचा अपमान झाला. इंद्राला शासन करेल असा पुत्र आपल्याला लाभावा या हेतूने त्याने घोर तप केले. ब्रह्मदेव प्रसन्न झाले व त्यांनी तुला इंद्र, विष्णू व महादेव यांच्यापेक्षाही पराक्रमी पुत्र मिळेल असा वर दिला. त्याप्रमाणे शिरवी ऋषींच्या शेंडीतून अत्यंत तेजस्वी असा चतुष्पाद पशू पडला. ब्रह्मदेवांनी त्याचे नाव नंदिकेश्वर ठवले. तो वरुण, अग्नी व वायू यांचे प्रतीक असल्याचे सांगितले. भूक लागली म्हणून पित्याच्या सांगण्यावरुन नंदी क्षीरसागरातील दूध पिऊ लागला.

विष्णूचे दूत तसेच स्वतः विष्णू यांनाही तो आवरेना. साठ दिवस युद्ध झाल्यावरही तो हरेना म्हणून विष्णूच त्याच्यावर प्रसन्न होऊन द्वापरयुगात मी तुझे पालन करीन, असे त्यांनी आश्वासन दिले. पुढे पुन्हा भूक लागल्यावर पित्याच्या सांगण्यावरून नंदी इंद्राच्या नंदनवनातील तृण खाऊ लागला. तेव्हा इंद्राशी त्याचे युद्ध झाले. त्याच्या शेपटीच्या झटक्याने इंद्र कैलासावर शंकरांच्या पुढ्यात पडला. नंदीने इंद्राच्या सिंहासनाचा चक्काचूर केला. इंद्राच्या विनंतीनुसार शंकराचे सैन्य नंदीवर चालून गेले. पण नंदीपुढे सैन्यच काय, खुद्द शंकरही हताश झाले. त्याची अचाट शक्ती पाहून त्यांनी त्याच्यावर कृपा केली.

तेव्हा नंदी शंकरांना म्हणाला, आज तुझ्यासारखा याचक भेटला याचा मला आनंद होतो. तू माझ्याकडे काहीतरी माग. यावर शंकराने त्याला आपले वाहन हो, असे मागणे मागितले. मोठ्या संतोषाने नंदीने ते मान्य केले. शंकरांनी त्याचा स्वीकार करून त्याला सतत आपल्याजवळ ठेवण्याचे तसेच आपल्या अगोदर तुझे दर्शन घेतले जाईल असे सांगितले. तू आपल्या उदरात क्षीरसागरातील दूध, नंदनवनातील गवत व सर्व शस्त्रे साठवलीस म्हणून तुझ्या शेणाचे भस्म मी सर्वांगाला लावत जाईन, असेही शंकर म्हणाले. याप्रमाणे शंकर व नंदी यांचा सहवास घडून आला. सर्व देवांनी शंकराचे नाव पशुपती असे ठेवले. हे कळल्यावर शिरवी ऋषीलाही आनंद झाला.

## जीवन का अमृत (भाग १)



आंतरिक ज्योति के साथ भी यही बात लागू होती है, ऐसी ज्योति जो के साम्राज्य से आती है। यह एक प्राकृतिक विज्ञान है और इसे इंसान ने नहीं बनाया। इसे सिद्ध किया जा सकता है। यह भावनाओं या तर्क-वितर्क का रास्ता नहीं है। यह देखने और सुनने का मजमून है १ जिनकी आँखें हैं, वे देखें और जिनके कान हैं, वे सुनें ।

अंतर में आत्म-अनुभव से आप पाएँगे कि आप खुद चट्टान जैसे मजबूत हो जाते हैं, जिसे औरों के शब्दों की मूसलाधार बारिश भी नहीं हिला सकती । भावनाएँ, तर्क-वितर्क या इंद्री ज्ञान त्रुटिपूर्ण हो सकता है, पर आत्म-अनुभव सर्वोपरि है ।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

आत्म-अनुभव से आप प्रकृति के इस विज्ञान को पूरी तरह समझ जाओगे और तब आप दूसरों को भी प्रेमपूर्वक समझा सकते हैं कि सच क्या है ।

मैंने आपकी आर्थिक व्यवस्था के बारे में पढ़ा, जो कि सतगुरु की अपार दया से ठीक हो गई है। सतगुरु अपने शिष्यों की हर प्रकार से, जिंदगी के हर क्षेत्र में संभाल करता है। पर जुआ खेलना एक महापाप है और आध्यात्मिक जिज्ञासुओं को खबरदार किया जाता है कि अपने आध्यात्मिक विकास के बड़े हित को ध्यान में रखते हुए वे जुआ न खेलें ।

७३. मैं आपके दिलों में प्रेम के बीज बोना चाहूँगा, ताकि प्रेम की भावना सब तक पहुँचे, संसार के सभी देशों, जाति, रंग और वर्ग में। सभी संतों ने यही उपदेश दिया - प्रेम करना सीखो, आपको सब बरकतें मिलेंगी।

यदि हम प्रभु को सच्चे हृदय से और व्यावहारिक तौर से प्रेम करना चाहते हैं, तो हमें अपने साथियों से प्रेम करना चाहिए। जितना प्रेम हम अपने दोस्तों, रिश्तेदारों से करते हैं, उतना ही हम, और लोगों से भी करें। हम दूसरों की खुशी में खुश हों और दूसरों के दुःख में दुःखी हों। जो कुछ भी हमारे साथ घटता है, उसे हम खुशी-खुशी निभाए और सहन करें तथा प्रभु के किसी भी जीव को नुकसान न पहुँचाएँ। आपको पता होना चाहिए कि प्रभु से प्रेम करने के लिए हमें प्रभु के लिए जीना होगा और प्रभु के लिए मरना होगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

संकल्प होता है। संकल्प दिखता नहीं परंतु बहुत शक्तिशाली है। हमारे दिमाग में ऐसी सूक्ष्म मशीनरी है जो किसी भी जीव व पदार्थ को देखते ही उसे अणु में बदल देता है। मान लो हम मेज को देखते हैं तो देखते ही मन उसे छोटा से छोटा बनाना शुरू कर देता है। उसका एक ग्राम बना देता है। फिर उस ग्राम के एक लाख टुकडे कर देता है। इस लाखवें टुकड़े को अणु कहते है । हमारा मन इस अणु को फिर एक करोड़ हिस्सों में बांट देता है। यह जो करोड़वा अंश प्रकृति का सबसे छोटा रुप है। इसे कवनटम कहते हैं। यही संकल्प का सूक्ष्म रुप है। हमारे अन्दर जो भी अच्छे बुरे संकल्प चल रहे हैं। वह सब इतने सूक्ष्म हैं। कवंटम लेवल पर संकल्प में जो विद्युत बल है, जो चुम्बकीय शक्ति है,

### आज्ञा चक्र

जो प्रकाश है उन सब का भी इतना सूक्ष्मतम रुप है। यहीं पर आत्मा, परमात्मा और प्रकृति का मिलन स्थान है। यहीं पर तीनों एक दूसरे को प्रभावित करते हैं। यहीं पर तीनों का एक दुसरे पर असर होता । इस कवनटम लेवल पर जा कर हम पहचानते हैं कि यह मेज है। यह फलाना व्यक्ति है, घर है, गाड़ी है, स्कूटर है, रिक्शा है, फलाना बच्चा है, फलानी पुस्तक है, फलाना शब्द है और वहीं से मन रिवर्स चलता है और उन देखी गई चीजो को बड़ा बनाता जाता है और हम उसे मेज या अन्य कोई भी वस्तु व व्यक्ति कह कर पुकारते हैं। यह सारी प्रक्रिया पल भर में ही पूरी हो जाती है। यह कार्य दिमाग के विभिन्न भाग करते हैं। हम हर विचार इस लेवेल पर करते हैं। अर्थात हम जो कुछ देखते हैं, करते हैं, सोचते हैं, बोलते हैं चाहे अच्छा चाहे बुरा, इतना गहराई पर जा कर सोचते हैं। किसी चीज को उठाना हो तो इस कवनटम लेवेल पर मन प्रकृति की किसी चीज को उठाने का आदेश देता है तब हम वह वस्तु उठाते हैं। यही परमात्मा की फ्रीकवेन्सी है। यहीं पर हर विचार ईथर तत्व में प्रवेश करता है तथा सारे ब्रह्मांड में फैल जाता है। संसार में जितने भी अच्छे वा बुरे काम हो रहे हैं वह सब इस कवनटम लेवल से हो रहे हैं। संस्कार में जो चीजे हैं वह इतनी गहराई पर पड़ी हुई हैं। यहीं पर रोग पनपते हैं।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**चिंटू :** तुझ्याकडे माझा मोबाईल नंबर आहे ना? मग पत्र का पाठवलेस?

**पिंटू :** आधी फोनच केला होता पण एक बाई सारखी सांगत होती, 'प्लीज ट्राय लेटर'!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या देशाने कच्चे तेल, पेट्रोलवरील विंडफॉल कर रद्द केलाय?

– भारत

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

संस्कार हे आजी-आजोबांकडूनच मिळू शकतात. सहसा नातवंडांचे आई-वडील घरात उपस्थित असतील, तर त्या वेळी नातवंडांच्या बाबतीतील निर्णय आई-वडिलांना घेऊ द्यावेत. ज्या वेळी नातवंडांचे आई-वडील घरात उपस्थित नसतील, तर अशा वेळी आपण आजी-आजोबा म्हणून निर्णय घ्यावेत.

३. नातवंडांना घडविताना, शिस्त लावताना जर त्याचे आई-वडील त्याला समजावून सांगत असतील, तर त्यांच्यामध्ये आजी-आजोबांनी न पडलेलेच बरे! कारण भविष्यात मुलाच्या चांगल्या किंवा वाईट वागणुकीला आई-वडिलांनाच तोंड द्यावे लागते.

### आजी-आजोबांची साथ

याकरिता शिस्त लावण्याचे काम हे आई-वडिलांनीच करावे व त्याला आजी-आजोबा म्हणून तुम्ही मदत करावी. अनेक वेळा नातवंडांच्या बाबतीत निर्णय घेताना आजी-आजोबा विरुद्ध आई-बाबा असे चित्र अनेक घरांत बघायला मिळते व त्यामध्ये नुकसान नातवंडाचे होते. बालसंगोपन करताना अनेक वेळा सास-सून यांच्यामध्ये वाद होताना दिसतात. सहसा एकमेकींनी मुलांसमोर एकमेकींविषयी वाईट बोलू नये. त्याचे दुष्परिणाम मुलांवर दिसून येतात. दोघींनी एकमेकींचा आदर ठेवावा व एकमेकींमधल्या चांगल्या गोष्टींची जाणीव ठेवावी. तुमच्या बोलण्यामध्ये सभ्यता, नम्रता व आदर असेल, तरच तुमच्यासमोर घडणारे मूलही भविष्यात तुमच्याशी आदरयुक्त बोलेल.

५. आजी-आजोबांकडून नकळत नातवंडांचे लाड जास्त होतात. या लाडांवर वेळीच आवर घालावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# स्वधर्म, स्वभाषा आणि स्वबोध याची ओळख करून घ्या

## डॉ. हृषीकेश कुलकर्णी यांचे प्रतिपादन; दहावी आणि बारावीच्या परिक्षेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा

नगर - पूर्ण जगात फक्त भारतातच पुरातन कालपासूनची परंपरा टिकून आहे. ही परंपरा टिकवण्याचे काम ब्राम्हण समाज करत आहे. जुन्या पिढीने आपल्या रक्ताने व अश्रुने सिंचन केल्याने या परंपरा टिकवल्या आहेत. आता हा वारसा युवा पिढीने टिकवायचा आहे. जीवनात कितीही मोठे करियर करताना ही महत्वाची जबाबदारी टाळू नका. यासाठी स्वधर्म, स्वभाषा आणि स्वबोध याची ओळख करून घ्या, असे प्रतिपादन पश्चिम महाराष्ट्र धर्मजागरण प्रलेखन विभाग प्रमुख डॉ. हृषीकेश कुलकर्णी यांनी केले.



ब्राम्हण बिझनेस नेटवर्क वेल्फेअर असोसिएशन आयोजित दहावी आणि बारावीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळ्यात मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते डॉ. हृषीकेश कुलकर्णी.

अहिल्यानगर शहरातील ब्राम्हण बिझनेस नेटवर्क वेल्फेअर असोसिएशन (बीबीएन)आयोजित ब्राम्हण समाजातील दहावी आणि बारावीच्या परिक्षेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा ऋग्वेदभवन येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख वक्ते डॉ. हृषीकेश कुलकर्णी बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चिन्मय सुखटणकर, विश्वस्त अनिरुद्ध देवचक्के, सीए हृषीकेश धर्माधिकारी, सीएस धनश्री कुलकर्णी आणि समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरेश क्षीरसागर म्हणाले, समर्थ रामदास आणि संतांचे विचार विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात प्रगती करण्यासाठी मार्गदर्शक ठरतील. बीबीएन वेलफेअर असोसिएशन समजाच्या संघटनासाठी करीत असलेले काम उल्लेखनीय व कौतुकास्पद आहे.

अनिरुद्ध देवचके म्हणाले, पालकांनी आपला खांदा पाल्यांसाठी विश्वासाने मान ठेवण्यासाठी रिकामा ठेवा. पालकांचा खांदा न मिलायास मुलं भरकटतात. त्यासाठी दोघांमध्येही मोकळा संवाद आवश्यक आहे.

चिन्मय सुखटणकर म्हणाले, अभ्यासाइतकेच स्वतःच्या शरीराकडे लक्ष देत शरीर संपदा सांभाळा. शिक्षणाला वयाचे बंधन नसून व्यवसायभिमुख शिक्षणाला महत्व द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात अर्थ सल्लागार राजेश देशपांडे आणि स्नेहालय इंग्लिश विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांचा गौरव करण्यात आला. संस्थेचे सचिव निखिल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली. सूत्रसंचालन अमित काळे यांनी केले. स्नेहल धर्माधिकारी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमेश भालेराव, श्रीपाद पुणतांबेकर, अमित परंडकर, शैलेश राजगुरू, शिल्पा सोमणी, हेमंत लोहगावकर आणि मिलिंद कुलकर्णी, सुकन्या फणसाळकर, अशोक बकोरे आदींनी सहकार्य केले.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीचा दैदिप्यमान निकाल

## ९६% विद्यार्थी उत्तीर्ण

नगर - अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीने यावर्षी पुन्हा एकदा उत्कृष्ट निकालाची परंपरो जपत ९६% यशाचे शिखर गाठले आहे.

प्रथम वर्ष टॉपर विद्यार्थी : प्रथम क्रमांक गोरे पूर्वा - ८२.१०%, द्वितीय क्रमांक परभणे कल्याणी - ७५.८०%, तृतीय क्रमांक नाहर साक्षी - ७३.८०%

द्वितीय वर्ष टॉपर विद्यार्थी : प्रथम क्रमांक निकिता शिंदे - ७७.४६%, द्वितीय क्रमांक आस्था आरवडे - ७२.९१%, तृतीय क्रमांक नितीन साळवी - ७१.८२%

विद्यार्थ्यांच्या यशामागे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांचे योगदान आहे. तसेच प्रा. माधुरी पवार, प्रा. प्रतिक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड, प्रा. खंडागळे शितल प्रा. रुचिता पवार, अमोल बर्डे, गावडे अनिल व भागवत बाळासाहेब यांचे मार्गदर्शन लाभले.



श्रीक्षेत्र डोंगरगण येथील ज्ञानेश आश्रम पायी दिंडीचे स्वागत संभाजीनगर रोडवर गुरुवारी सकाळी निक्रड परिवाराने केले. यावेळी उषाताई शेळके, किरण कराळे, सुजल शेळके, स्वप्नील कराळे विणेकरी बबन गाडे, राधाकिसन भुतकर, श्यामराव गोरे भाविक आदी (छाया - विजय मते)



हरित दिंडी मार्ग या उपक्रमांतर्गत केशवराव गाडीलकर विद्यालयात सीडस् बॉल तयार करण्यात आले.

# 'हरित दिंडी मार्ग' उपक्रमांतर्गत सीडस् बॉल तयार

नगर - भास्कर ग्रुप नगर शाखेचे प्रमुख आर जे सिद्धू यांच्या प्रयत्नातून हरित दिंडी मार्ग या उपक्रमांतर्गत सावेडी येथील केशवराव गाडीलकर विद्यालयात २४ जून रोजी सीडस् बॉल तयार करून घेण्यात आले. यामध्ये शेणखत माती आणि थायमेट यांचा वापर करून वरील घटक एकत्र केले गेले. प्रत्येक मुलाला आयुर्वेदिक झाडे करंज; बहावा (पिवळा) तसेच कडूनिंब, जांभूळ, चिंच यांच्या बिया देण्यात आल्या.

मुलांनी दिलेल्या बियांपासून सीडस् बॉल तयार केले. ते सीडस् बॉल चांगले सुकल्यानंतर नाशिक येथे त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे आणि नंतर ते विविध मार्गावर टाकले जातील. त्यातून काही दिवसातच मोठे वृक्ष तयार होतील

या कामी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे सचिव गाडीलकर नामदेव, मुख्याध्यापक गायकवाड अनिल, सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका काळे लतिका, शिंदे बी बी, देशपांडे जे आर, डाके सी एम, बोराटे संगीता, सुरेखा गरजे, मनीषा बोर्डे, शिपाई शेलार अनिल व मेहत्रे मुरलीधर यांनी सहकार्य केले.

# वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे भाग्य

## प्रसाद गांधी यांचे प्रतिपादन; मर्चंटस बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने वारकऱ्यांची उपयुक्त भेट देऊन सेवा

नगर - पंढरीचा आषाढी वारी पायी सोहळा हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. आषाढी वारीसाठी नगर शहरामधून पंढरपूरला जाणाऱ्या पायी दिंडी-मधील वारकरी बंधू-भगिनींची सेवा करण्याची संधी मिळते ही अतिशय आनंदाची बाब आहे. वारकऱ्यांमध्ये पांडुरंगास पाहिले जाते. पायी वारीतील वारकरी हे पांडुरंगाचे रूप आहेत. बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या प्रेरणेतून दरवर्षी वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळते असे प्रतिपादन अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेचे कर्मचारी प्रतिनिधी संचालक प्रसाद गांधी यांनी केले.



बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी बंधू-भगिनींना राजगिरा लाडू, चिवडा, सुवासिक खोबरेल तेल, मेडिमिक्स साबण भेट देण्यात आले.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा नगर शहरातील मार्केट यार्ड येथे हनुमान मंदीराच्या प्रांगणात मुक्कामी होता. बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी बंधू-भगिनींना राजगिरा लाडू, चिवडा, सुवासिक खोबरेल तेल, मेडिमिक्स साबण भेट देण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक यांच्या हस्ते वारकऱ्यांना ही भेट देण्यात आली. याप्रसंगी जॉइंट सीईओ नितीन भंडारी, प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा, कर्मचारी स्वप्निल बोराणा, रामप्रसाद सारडा, अमित सोनग्रा, योगेश गुगळे, महेंद्र फिरोदिया, अशोक जिंदम, चेतन लोढा, अभिजित बोरा आदी उपस्थित होते.

सुनील पुराणिक म्हणाले की, आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी लाखो भाविक पंढरपुरला पायी मार्गक्रमण करीत असतात. ऊन, वारा, पाऊस सहन करत केवळ विठुरायाच्या दर्शनाची ओढ असते. अशा वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य मर्चंटस बँकेच्या कर्मचाऱ्यांना लाभते. बँकेत कर्तव्य बजावताना जो सेवा भाव असतो तोच सेवा भाव कर्मचारी वारकरी सेवेत दर्शवतात. त्यामुळे प्रत्येकाला आध्यात्मिक ऊर्जा प्राप्त होते.

नितीन भंडारी यांनी दिंडीतील मानकऱ्यांसह वारकऱ्यांचे स्वागत करताना सांगितले की, मर्चन्टस् बँक खातेदारांची सेवा करण्यात अग्रभागी आहे. तोच सेवाभाव वारकरी बंधू-भगिनींना भेट देताना जपण्यात आला आहे.

मर्चंटस बँकेच्या मार्केट यार्ड येथील मुख्य शाखेसमोरच असलेल्या हनुमानजींच्या मंदिर प्रांगणात परंपरेप्रमाणे संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तीनाथांचा पायी पालखी सोहळा मुक्कामी असतो. हे लक्षात घेऊन बँकेच्या नगरमधील सर्व शाखांचे कर्मचारी वृंदांनी एकत्रित येऊन वारकरी बंधू-भगिनींना उपयुक्त भेट देण्याचे नियोजन केले. पांडुरंगानेच त्यांच्याकडून ही सेवा करवून घेतली. याकरिता बँकेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमनसह संचालक मंडळाचे सहकार्य लाभले.



संगमेश्वर (खांबा) ते पंढरपूर पायी दिंडीचे नगरमध्ये चोपडा परिवारातर्फे स्वागत करण्यात आले.

# वारकऱ्यांच्या सेवेतून साक्षात पांडुरंगाची सेवा घडते

## उगले महाराज यांचे प्रतिपादन; संगमेश्वर (खांबा) ते पंढरपूर पायी दिंडीचे नगरमध्ये चोपडा परिवारातर्फे स्वागत

नगर - चोपडा परिवाराच्या धार्मिकतेचे दर्शन आषाढी वारीवेळी घडते. ११ वर्षांपासून चोपडा परिवार दिंडीचे नगर शहरात उत्साहात स्वागत करीत आहे. वारकऱ्यांची मनोभावे सेवा करताना महाप्रसादाची व्यवस्था केली जाते. वारकऱ्यांच्या रूपाने त्यांच्या हातून साक्षात पांडुरंगाची सेवा घडत आहे. अध्यात्माची शिकवण संपूर्ण परिवार जपत आहे असे कौतुकोद्गार संगमेश्वर(खांबा) ते पंढरपूर पायी दिंडीचे प्रमुख हभप उगले महाराज यांनी काढले.

संगमेश्वर(खांबा) ते पंढरपूर पायी दिंडीचे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी टिळक रोडवर माउली सांस्कृतिक भवन येथे चोपडा परिवार (खांबावाला) यांच्यावतीने स्वागत करण्यात आले. दिंडीप्रमुख ह.भ.प. उगले महाराज यांचा श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी रमेश चोपडा, मनोज, संदीप, मंगेश, अतुल, निलेश, शितल चोपडा परिवार, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, सुनील रामदासी, अमृतलाल चोपडा, झंकारमल चोपडा, प्रकाश भळगट, प्रकाश गांधी, संजय चोपडा, राजेंद्र गांधी, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, बाबालाल गांधी आदी उपस्थित होते. यावेळी सेंट्रल बँक रोडवरील गुगळे मेडिकलच्यावतीने वारकऱ्यांना मोफत औषध देण्यात आली तसेच आरोग्य मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रविण गुगळे, चैतन्य गुगळे, सागर गुगळे आदी उपस्थित होते.

रमेश चोपडा म्हणाले, आमचे वडील बंधू सूरजमल चोपडा व वहिनी शामाबाई चोपडा यांची वारकरी संप्रदायावर नितांत श्रध्दा होती. दरवर्षी आषाढी यात्रेवेळी ते वारकऱ्यांच्या सेवेत रममाण व्हायचे. भजन, किर्तनात तल्लीन व्हायचे. त्यांचा हाच सेवेचा वारसा आमचा परिवार पुढे चालवत आहे. पांडुरंगाच्या दर्शनासाठी उन पावसाची तमा न बाळगता पंढरपूरकडे निघालेले वारकऱ्यांमध्ये आम्हाला पांडुरंग दिसतो. त्यामुळे त्यांची सेवा करताना मनाला आनंद मिळतो. आषाढी वारीची परंपरा महाराष्ट्राचे मोठे अध्यात्मिक वैभव आहे.

# सावेडीत सद्गुरु गंगागिरी महाराज पायी दिंडी सोहळ्याचा रिंगण सोहळा

नगर - आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, सावेडी परिसरात पारंपरिक आणि भक्तिभावाने परिपूर्ण असलेल्या सद्गुरु श्री गंगागिरी महाराज पायी दिंडी सोहळ्याच्या रिंगण सोहळ्याला उत्साहात सुरुवात झाली. वारकरी संप्रदायातील एक महत्त्वपूर्ण सोहळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दिंडीचे यंदा देखील विविध धार्मिक आणि सामाजिक स्तरावर स्वागत करण्यात आले.



सावेडीत सद्गुरु गंगागिरी महाराज पायी दिंडी सोहळ्याचा रिंगण सोहळा रंगला. (छाया - लहू दळवी)

या पवित्र दिंडी सोहळ्याचे कै. नानासाहेब बारस्कर कुटुंबियांच्या वतीने स्वागत करण्यात आले. गेल्या ३५ वर्षांपासून ही परंपरा यंदाही तितक्याच भक्ती-भावाने जपली गेली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पवित्र पालखीचे विधीवत पूजन करण्यात आले.

महंत रामगिरी महाराज यांनी यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधताना सांगितले की, महाराष्ट्राला संत महंतांची थोर परंपरा लाभली असून, पांडुरंगाच्या भक्तीतून आनंदी व अर्थपूर्ण जीवन जगता येते. गंगागिरी महाराज यांना ज्ञानेश्वरी आणि वारी यांची गहिरी आस्था होती. आजही त्याच परंपरेचा वारसा हे पायी दिंडी सोहळे जपत आहेत. यावेळी सोहळ्यात आ. संग्राम जगताप, भिमाबाई बारस्कर, बाळासाहेब बारस्कर, माजी नगरसेविका दीपालीताई बारस्कर, सचिन बारस्कर, सतीश बारस्कर, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी नगरसेवक धनंजय जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती लाभली. वारकरी, महिला भक्तगण, नागरिक सहभागी झाले होते.

रिंगण सोहळ्यात उंच उंच पताका, टाळ- मृदंगाचा गजर, भक्तीमय अभंग व विठुरायाच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विविध वयोगटातील वारकऱ्यांचा उत्साह व भक्तिभाव पाहता हे श्रद्धेचे दर्शन होते.

# प्रोत्साहनपर शिष्यवृत्तीसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नगर - साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) कार्यालयामार्फत सन २०२५-२६ या वित्तीय आर्थिक वर्षामध्ये इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिक इत्यादी अभ्यासक्रमामध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनींना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती मंजुर करण्यात येणार असून यासाठी १५ जुलै पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक गोकुळदास जे. पगारे यांनी केले आहे.

अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, मार्क मेमो, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याबाबतची रजिस्ट्रेशन पावती/ बोनाफाईड, मतदान कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, एक पासपोर्ट साईज फोटो इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

मातंग/मांग समाज व तत्सम १२ पोट जातीतील विद्यार्थी -विद्यार्थीनींनी १५ जुलै पर्यंत आवश्यक कागदपत्रासह अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या) जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर मनमाड रोड, सावेडी अहिल्यानगर येथे सादर करावेत.



'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा सन्मान करताना आमदार संग्राम जगताप, ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर, सचिन पेंडुरकर, अभिजीत ढाकणे.




चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर येथे सन्मानपूर्वक इन्व्हेस्टिचर सेरेमनी पार पडली.

# चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी

नगर - चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर येथे सन्मानपूर्वक इन्व्हेस्टिचर सेरेमनी पार पडली. नेतृत्व, जबाबदारी आणि शिस्तीचे प्रतीक असलेला हा सोहळा शाळेच्या शैक्षणिक आणि सांघिक मूल्यांचा साक्षीदार ठरला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध मार्चपास्टने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या एकात्मतेचा, सहकार्याचा आणि आत्मविश्वासाचा प्रत्यय यामधून स्पष्टपणे आला.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे अभिनेत्री, दिग्दर्शिका व नृत्यदिग्दर्शिका शैला कुलकर्णी यांची उपस्थिती. त्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, आत्मशिस्त, जबाबदारी आणि आत्मविश्वास याचे महत्त्व त्यांच्या प्रेरणादायी भाषणातून समजावून सांगितले. यशस्वी नेतृत्वासाठी मनाच्या शिस्तीबरोबरच मूल्याधिष्ठित कृती आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांना हाऊस बॅचेस व साशेस प्रदान करण्याचा सन्मान शाळेचे संचालक संजय चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सचदेव, मुख्य अतिथी सौ. शैला कुलकर्णी आणि हाऊस शिक्षकांच्या हस्ते पार पडला.

संजय चव्हाण यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले, नेतृत्व म्हणजे केवळ पद नाही, तर ती एक सततची प्रेरणा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कृतीतून इतरांसाठी आदर्श निर्माण केला पाहिजे. शाळेने नेहमीच विद्यार्थ्यांमध्ये आत्मशिस्त, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यावर भर दिला आहे.

अशोक सचदेव यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करताना सांगितले, आजचे हे नेतृत्व उद्याचे देशाचे आधारस्तंभ ठरणार आहेत. म्हणून प्रत्येकाने आपल्या जबाबदाऱ्यांचे गांभीर्य ओळखून प्रामाणिकपणे काम करावे. शाळेच्या प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण आहेत; त्यांना योग्य दिशा देणे हे आपले कर्तव्य आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती रुपाली शेटे यांनी केले. बॅचेस प्रदान सोहळ्यानंतर प्रियांका पांडे यांनी आपल्या मनापासून केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.




महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर आवश्यक

## सामाजिक न्याय दिन कार्यक्रमात उलटला सूर

नगर – राजर्षी शाहू महाराज यांची जयंती दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी केली जाते. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी वसतीगृहांसारखे लोकोपयोगी उपक्रम राबवले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, त्यांच्या आदर्शानुसार वर्तन करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा व तत्त्वज्ञ होते. लोककल्याणाचा त्यांनी नेहमी पुरस्कार केला व स्वनिर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली. आजच्या काळात त्यांच्या विचारांचा जागर होणे अत्यावश्यक असल्याचा सूर समाजकार्य महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमातून उमटला. सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषदेचा समाजकल्याण विभाग व समाजकार्य महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजकार्य महाविद्यालयात सामाजिक न्याय दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे, सुभाष वारे, समाजकार्य महाविद्यालयाचे संचालक सुरेश पठारे, सामाजिक कार्यकर्त्या संध्या मढे, सहाय्यक लेखाधिकारी संदीप देठे, विशेष अधिकारी सावित्रा लबडे आदी उपस्थित होते.

या प्रसंगी व्याख्याते सुभाष वारे म्हणाले, सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून काम करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा इतिहास प्रेरणादायी आहे. त्यांनी वैचारिक प्रबोधनाचा वारसा दिला व तो आपल्या कृतीतून अंमलात आणला. सर्वधर्मसमभाव केवळ सांगितला नाही, तर प्रत्यक्षात तो विचार राबवला. सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शिक्षणाचा प्रसार, महिलांसाठी कायदे, आरक्षणाचे धोरण, सर्वधर्मीयांसाठी रोजगारनिर्मिती, आधुनिक शेती तंत्रज्ञान, पाण्याची उपलब्धता, सहकारी संस्थांची उभारणी व औद्योगिक धोरण राबवून त्यांनी संधीसमानतेचे मूल्य जपले, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमासाठी विविध विभागांचे अधिकारी–कर्मचारी, शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, बार्टीचे समतादूत आदी उपस्थित होते.

समता दिंडीस प्रतिसाद...राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या दिंडीला विद्यार्थी, विद्यार्थिनी, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

# इलेक्ट्रिकल इंजिनियरच का?



आजच्या डिजिटल युगात आणि अशा वेगवान दुनियेत जर आपण अगोदरच्या काळात जर डोकावून पाहिले, तर आपल्याला मनुष्य प्राणी हा खूप बुद्धिमान आहे हे सिध्द होते. कारण त्याने विविध क्षेत्रात आणि तंत्रज्ञानात खूप प्रगती केली आहे. असंच जर आपण विद्युत क्षेत्राकडे वळून पाहिले, तर आपल्याला त्यामध्ये खूप सारे चमत्कारिक बदल दिसून येतात. असे म्हणतात की वीजेशिवाय हे जीवन कल्पनेपलीकडचे आहे. कारण विद्युत अभियंत्यांनी या क्षेत्रात खूप यशस्वी पाऊले टाकली आहेत. पहिले आपल्याला इलेक्ट्रिक इंजिनियर म्हणले की फक्त इलेक्ट्रिक मशीन, इलेक्ट्रोमॅग्नोटीझम, पॉवर जनरेशन असे शब्द डोळ्यासमोर यायचे. पण इलेक्ट्रिक इंजिनियर ही शाखा केवळ तेवढ्या पुरती मर्यादित राहिली नाही. त्यामुळे इलेक्ट्रिकल इंजिनिअर हा एक अविभाज्य घटक बनलेला आहे.

सध्या जर बाजारात पहिले तर दिसून येते की इलेक्ट्रिक वाहनांची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. भारताने जगातील इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात अग्रगण्य असे स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर भारत हेवी इलेक्ट्रिक व्हेइकल, पॉवर ग्रीड, विविध विद्युत मंडळे, टाटा पॉवर, शासकीय आणि निमशासकीय अशा कंपन्या मध्ये विद्युत अभियंत्याची मागणी खूप प्रमाणात वाढली आहे. तसेच भारता बाहेर देखिल जसे की अमेरिका, कॅनडा, जपान नि जर्मनी अशा विविध देशांमधील मोठमोठ्या कंपन्यांमध्ये संशोधन तसेच करिअर संधी या इलेक्ट्रिकल इंजिनियरसाठी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत.

भारतातील इलेक्ट्रिक वाहनांची विक्री पाहता, सरकारने विविध उपक्रम व प्रकल्प राबवले आहेत. भारत सरकारच्या नियोजनानुसार २०३० हे इलेक्ट्रिक वाहनाचे युग असणार आहे. देशातील सुरक्षा, पर्यावरण, रक्षण आणि प्रदूषण मुक्तता हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळेच इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहने यामध्ये प्रगती करण्यासाठी विद्युत अभियंत्याची गरज खूप मोठ्या प्रमाणात आहे.

विद्युत अभियंत्याचे महत्त्व आणि गरज ही कायमच होती, आहे आणि राहणार, भविष्यात अभ्यासासाठी किंवा तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी विद्धुत अभियंत्यांना अव्वल दर्जाचे स्थान मिळणार आहे नि राहणार, म्हणूनच विद्युत अंभियात्रिकी शाखेची निवड मोठ्या संख्येने गुणवान विद्यार्थी नक्कीच करतात.

**– प्रा.पूनम कांबळे, डिप्लोमा कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, जामखेड माजी विद्यार्थिनी, डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर**

# शाहू महाराजांचे विचार हे कृतीतून दिसावे

## शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांचे प्रतिपादन; महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात जयंती साजरी, सामाजिक न्याय दिनानिमित्त केडगावमधून मिरवणूक




महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाच्या वतीने राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यात येवून यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात मिरवणूक काढण्यात आली.

नगर – शाहू महाराजांचे विचार हे कृतीतून दिसले पाहिजे. मुलांपेक्षा मुली कमी नाहीत, असे वातावरण या शाळेमध्ये आहे. मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे काम शाळेने केले आहे. शाहू महाराजांचे विचार आत्मसात करुन जीवनात मार्गक्रमण करा. शाळेतील वेगवेगळ्या शिष्यवृत्ती परीक्षेतूनच स्पर्धा परीक्षेचा पाया रचला जातो. यामध्ये सातत्य ठेवण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांनी केले.

राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे, केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाच्या वतीने राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत शाहू महाराजांच्या वेशातील विद्यार्थ्यांनी नागरिकांचे लक्ष वेधले. तर यामध्ये मावळ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो..., सामाजिक न्यायदिनाचा विजय असो... या दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणला. पर्यावरण रक्षण हेच मूल्य शिक्षण, मुले–मुली एकसमान दोघांनाही शिकवा छान, प्लॅस्टिकचा वापर टाळा पर्यावरणाची स्वच्छता राखा, स्वच्छता पाळा रोगराई टाळा आदी सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेऊन जनजागृती केली.

राजर्षी शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिनानिमित्ताने शाळेच्या वतीने सर्व स्तरातील ११० गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, बूट, शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षक बबन साळवे राजेश सोनवणे व सखाराम गारुडकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे यांच्या अध्यक्षतेखाली हा जयंती सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष राम चंद्र दरे म्हणाले की, दूरदृष्टी असलेला राजा म्हणजे शाहू महाराज होय. नगरमध्ये देखील त्यांनी आपल्या कार्यातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले. सर्व सम ाजाच्या उध्दारासाठी त्यांचे विचार दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव बबन कोतकर, सहसचिव रावसाहेब सातपुते, खजिनदार प्रल्हाद साठे, संचालक दगडू साळवे, सुभाष बागले, जयद्रथ खाकाळ, भास्कर जासूद, महेश गुंड, अजित साबळे, जयश्री कोतकर तसेच जोशी हॉस्पिटलच्या संचालिका वैजयंती जोशी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेणुका म्हस्के, प्राचार्या वासंती धुमाळ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद साठे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जालिंदर सातपुते, भारती गुंड व जयश्री कोतकर यांनी केले. प्राचार्या वासंती धुमाळ यांनी आभार मानले.



छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मखदुम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.

# कर्तव्य समजून गरजूंना मदत करायला हवी

## फिरोज तांबोली यांचे प्रतिपादन; छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मखदुम सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

नगर – समाजामध्ये गरजूंना मदत करणार्यांची संख्या वाढली आहे. पण लोक मदत करणे म्हणजे उपकार समजून करायला लागले आहे. ही मानसिकता बदलून कोणतेही मदत कार्य हे कर्तव्य समजून करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राईम कन्स्ट्रक्शनचे संचालक फिरोज तांबोली यांनी केले.

मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाऊंडेशन च्यावतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुष्ठधामरोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वैदुवाडी मधील सर्व विद्यार्थ्यांना शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, मुस्कान वेल्फेअर असोसिएशन, ॲड.अमीन धाराणी, निशांत दातीर, किरण उजागरे, सुनील वाघमारे, दिनेश मंजरतकर, प्रा. महबूब सय्यद, नंदकिशोर आढाव आदी दानशूरांच्या सहकार्याने मोफत वह्यांचे वाटप फिरोज तांबोली यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, शाळेच्या शिक्षिका मिनाक्षी धामणे, जाधव आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना फिरोज तांबोली म्हणाले की, समाजामध्ये स्वार्थीपणा फार वाढत चाललेला आहे. कोणतेही समाजा कार्य करतांना बहुतांश संघटनांचा त्यामागे काही ना काही हेतू असतो, असे समाजकार्य किंवा पुण्यकार्य परमेश्वरालाही नकोय. नि:स्वार्थीपणाने आज कार्य करण्याची खरी गरज असून, त्यासाठी बौद्धीक प्रबोधन होण्याचीही आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले. मिनाक्षी जाधव यांनी आभार मानले.

# नागरिकांच्या सोयीसाठी एका छताखाली दाखले उपलब्ध

## जिल्हाधिकारी पंकज आशिया यांचे प्रतिपादन; छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास नगरकरांचा प्रतिसाद



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात विविध दाखल्यांचे वाटप करताना जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी प्रांत सुधीर पाटील आदी. (छाया – अमोल भांबरकर)

नगर – छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांच्या द्वारे नागरिकांना लागणारे अनेक दाखले तसेच शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी हे शिबिर घेण्यात आले आहे. दाखले मिळविण्यासाठी नागरिकांना कार्यालयात यावे लागते. या शिबिराच्या माध्यमातून आपण राहतो त्या ठिकाणी शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना दाखले देण्यात येत आहेत. या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी केले आहे.

बोरुडे मळा येथील सिंधू मंगल कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, शिधापत्रिका, संजय गांधी, योजना पंचायत समितीच्या विविध योजना, कृषी विभागाचे योजना, शिक्षण विभागाचे योजना, वनविभागाच्या योजना, भूमि अभिलेख योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाचे योजना सदर शिबिरात विविध दाखल्यांचे वाटप जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपतराव बारस्कर, प्रा.माणिक विधाते, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, विलासराव ताठे, माजी नगरसेवक रवींद्र बारस्कर, मनोज ताठे, पुष्कर कुलकर्णी, तहसीलदार संजय शिंदे, अप्पर तहसीलदार स्वप्नील ढवळे, महसूलचे नायब तहसीलदार श्री.वांढेकर, निवासी नायब तहसीलदार श्री.दळवी, संजय गांधीचे नायब तहसीलदार भानवसे, संदीप काळे, सावेडी मंडळ अधिकारी शैलजा देवकाते, नागापूर मंडळ अधिकारी शेखर साळुंके, नालेगाव मंडळ अधिकारी वर्षा पवार, केडगाव मंडळ अधिकारी श्रीमती टेमक मॅडम, सेतु चालक भूषण घाडगे, रिजवान शेख, दिलीप आंबेडकर, शरद पवार, सागर सारोळकर, अमोल डागवाले, इरफान शेख, मनोज भुजबळ, प्रवीण पांडे आदींसह नागरीक उपस्थित होते.

बाबासाहेब वाकळे म्हणाले, जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या अडचणी दूर होत आहेत. उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, शिधापत्रिका, शैक्षणिक दाखले अनेक दाखले व विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचली आहे. तसेच या शिबिरातून अनेक नागरिकांना दाखले उपलब्ध झाले आहेत. नागरिकांच्या सेवेसाठी दर तीन महिन्याला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

सुधीर पाटील म्हणाले, या शिबिराला नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे. नागरीकांना सेवा उपलब्ध करून देणे. हाच खरा उद्देश या शिबिराचा आहे. तसेच नाविन्यपूर्ण शासकीय योजना नागरिकांपर्यंत पोहोचविणे.

# विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची आयटी कंपन्यांमध्ये यशस्वी प्लेसमेंट



विश्वभारती अकॅडमीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये नामांकित आयटी कंपन्यांमध्ये यशस्वी निवड झाली आहे.

नगर – विश्वभारती ॲकॅडमीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कॅम्पस प्लेसमेंट मध्ये नामांकित IT कंपन्यांमध्ये यशस्वी निवड झाली आहे. लॉजिपूल इन्फोटेक आणि नेक्स्टजेनराईज प्रा. लि. या कंपन्यांमध्ये विभागातील सहा विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

प्लेसमेंट मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कु. गौरी तवले, विशाखा बेरड, श्रेयस चौगुले, सूरज कदम, शुभम गायकवाड आणि अकिब शेख यांचा समावेश आहे. प्लेसमेंट प्रक्रिया ही महाविद्यालयात आयोजित कॅम्पस ड्राइव्हद्वारे पार पडली. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी विविध तांत्रिक चाचण्या, मुलाखती आणि प्रेझेंटेशन फेरीत उत्तम कामगिरी केली. नाविन्यपूर्ण प्रोजेक्ट्स, सखोल विषयज्ञान आणि सातत्यपूर्ण कौशल्यविकास याच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी सदर प्लेसमेंट मिळाली आहे. विभागामार्फत वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या मॉक इंटरव्ह्यूज, ॲप्टिट्यूड टेस्ट्स आणि इंडस्ट्री ओरिएंटेड ट्रेनिंग यांचा त्यांना मोठा फायदा झाला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि तांत्रिक प्राविण्य यामुळेच त्यांनी स्पर्धात्मक निवड प्रक्रियेत यश मिळवले.

विश्वभारती ॲकॅडमी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर हे ग्रामीण भागातील एक अग्रगण्य अभियांत्रिकी महाविद्यालय असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत प्लेसमेंट क्षेत्रात सातत्यपूर्ण यश मिळवत आहे. कॉलेजमध्ये नियमितरित्या इंडस्ट्री ओरिएंटेड ट्रेनिंग, मॉक इंटरव्ह्यूज, ॲप्टिट्यूड व कम्युनिकेशन स्किल्स वर्कशॉप्स आयोजित करून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवले जाते. याचबरोबर नामांकित कंपन्यांशी महाविद्यालयाने सामंजस्य करार केलेले आहेत. गेल्या काही वर्षांपासून संस्थेच्या विविध शाखांमधील विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये यशस्वी प्लेसमेंट मिळाली आहे. विश्वभारती कॉलेज विद्यार्थ्यांचे केवळ तांत्रिक कौशल्य वाढवण्यावर नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही विशेष लक्ष केंद्रित करते, जे त्यांना आजच्या स्पर्धात्मक उद्योगजगतात यशस्वी ठरवते. प्लेसमेंट सेलच्या सततच्या प्रयत्नांमुळे व विद्यार्थ्यांच्या प्रगल्भ तयारीमुळे कॉलेजची प्लेसमेंट कामगिरी दिवसेंदिवस अधिक भक्कम होत आहे.

# एस.डी. बर्मन, आर.डी. बर्मन यांच्या गीतांच्या 'लेकर हम दिवाना दिल' लाईव्ह संगीत संध्याचे २८ जून रोजी अहिल्यानगर शहरात आयोजन



नगर – ऋणानुबंध बहुउद्देशिय सामाजिक संस्थेने वाद्यवृंदासह लेकर हम दिवाना दिल या लाईव्ह म्युझिक संध्येचे सावेडी येथील माऊली सभागृह येथे २८ जूनला संध्याकाळी ५:३० वाजता आयोजन केले आहे. यावेळी संगीतकार एस.डी. बर्मन आणि आर.डी. बर्मन यांच्या गीतांचा लाईव्ह ऑर्केस्ट्रासह मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. तेरे मेरे मिलन की ये रैना, हम दोनो दो प्रेमी, कांची रे कांची रे, भीगी भीगी रातो मे, जय जय शिव शंकर, जानु मेरी जान, यम्मा यम्मा, कोरा कागज था ये मन मेरा इत्यादी गाजलेली गाणी या कार्यक्रमात सादर होणार आहेत.

या कार्यक्रमात अजित रोकडे, डॉ. दमन काशिद, प्रशांत बंडगर, महेश घावटे, डॉ. शैलेंद्र खंडागळे, डॉ. विवेकानंद कंगे, सारंग पंधाडे, अजय आदमाने, भानुदास महानुर, चारुदत्त ससाणे, संजय भिगारदिवे, सारिका रघुवंशी, प्रतिभा साबळे, सीमा रघुवंशी, मोनाली बोरुडे, डॉ. गायत्री कुलकर्णी इत्यादी कलाकार गीते सादर करणार आहेत.

हा कार्यक्रम प्रेक्षकांना विनामुल्य पाहता येणार असुन उपस्थित प्रेक्षकांना माधवबाग कडून विविध चाचण्यांवर डिस्काउंट कुपन दिले जाणार आहे. काही भाग्यवान प्रेक्षकांना लकी ड्रॉ मधुन पैठण्या दिल्या जाणार आहेत.


या कार्यक्रमाच्या पासेस साठी ९४२०६३५०९६, ९८२३८११११९, ७३५०८८१५१५ या क्रमांकावर फोन करावा असे आवाहन ऋणानुबंधचे सदस्य सचिव सचिन परदेशी यांनी केले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## एआयच्या विश्वासार्हतेचा प्रश्न

एआयच्या विश्वासार्हतेचा प्रश्न एआय अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजेन्सच्या लार्ज लँग्वेज मॉडेल्समध्ये एलएलएम नवे तंत्रज्ञान असल्याने त्यात नवनव्या शक्यता निर्माण होत आहेत. याचवेळी त्यांच्या विश्वासार्हतेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. अलीकडील संशोधनात असे आढळून आले आहे की, हे मॉडेल जितके सक्षम असतात, तितकेच ते चुकीची उत्तरे देखील देत असतात. असे मॉडेल्स युझर्सना आपण सर्वज्ञ आहोत, हे दर्शवण्याच्या प्रयत्नात त्यांचा मार्ग भरकटवण्यासाठी कारणीभूत ठरतात. स्पेनच्या व्हॅलेन्सियन रिसर्च इन्स्टिट्यूट फॉर एआयच्या एका अभ्यासातून हा दावा करण्यात आला आहे.



सदर संशोधनानुसार, ओपन एआच्या जीपीटी व मेटाच्या एललामा या मॉडेल्सनी काही अचूक उत्तरे जरूर दिली, पण याचबरोबर काही चुकीची उत्तरेही त्यांच्याकडून देण्यात आली. जसजसे प्रश्न जटिल होत गेले, तसतसे या मॉडेलकडून येणारे उत्तर त्यांची विश्वासार्हता कमी करणारे ठरत गेले, असे या अभ्यासात आढळून आले. तज्ज्ञांचा असा दावा आहे की, या मॉडेल्सवर विसंबून राहणे धोक्याचे ठरत चालले आहे. एरवी युझर्सचा अशा मॉडेल्सवर बराच विश्वास असतो, पण असा एकही प्रश्न असत नाही, ज्याचे उत्तर दिले जाणार नाही. या सर्व प्रक्रियेत प्रत्येक प्रश्नाला उत्तर देत असताना त्यांच्याकडे डेटा बराच असतो. पण, जितका प्रश्न कठीण, तितके त्याचे अचूक उत्तर मिळण्याची शक्यता अंधूक, असे समीकरण आता या आधुनिक मॉडेल्सबाबत दृढ होत चालले आहे असे या अभ्यासात पुढे नमूद आहे.

संशोधक जोस हर्नांडिझ ओरालो यांनी दिलेल्या माहितीनुसार, या अभ्यासात असेही आढळून आले आहे की, या मॉडेल्सचा फक्त आणि फक्त प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायचेच, यावर कटाक्ष असतो. आपण एखादा प्रश्न विचारल्यानंतर लगोलग अगदी दुसऱ्या सेकंदाला त्याचे उत्तर येते. याचाच अर्थ जो प्रश्न विचारला जाईल, त्याचा बहुतांशी डाटा त्यात फिड असतो. यापूर्वीचे मॉडेल एखाद्या प्रश्नाचे ठोस उत्तर माहीत नसल्यास त्यासाठी थोडाफार अवधी घेत असत, पण आता तसे होताना दिसून येत नाही.

आताचे नवे मॉडेल्स आपण सर्वज्ञ असल्याचे भासवतात आणि अशी प्रवृत्ती बुलशिटिंग असे म्हटले जाते. याचे मुख्य कारणच हे आहे की, या मॉडेल्सना केवळ प्रत्येक प्रश्नाचे उत्तर द्यायचे, यासाठीच प्रशिक्षित केले गेले असते आणि या पार्श्वभूमीवर त्यांचे उत्तर बरोबर असेलच, याची खातरजमा दिली जाऊ शकत नाही, असे सध्याचे चित्र आहे. भरलेल्या डेटामध्येच चुकीचा डेटा असेल तर त्याचे उत्तर चुकीचेच येणार, ही देखील यातील आणखी एक बाजू आहे.

## इथे इंटरनेट वापरणे गुन्हा!

आजच्या युगात इंटरनेट हा जणू आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक टूजी इंटरनेट वापरून देखील खूश होते, पण आता फोरजी इंटरनेट स्पीड देखील लोकांना कमी पडू लागली आहे. कारण, आता रोजच्या जीवनातील सर्वच गोष्टी इंटरनेटशी संबंधित आहेत. मनोरंजक कामासाठी जसे व्हिडीओ, सिनेमे पाण्यासाठी देखील इंटरनेट महत्त्वाची भूमिका बजावतो, पण तरीही असे काही देश आहेत जिथे इंटरनेट वापराला बंदी आहे किंवा त्यावर कडक निर्बंध आहेत. आता हे देश कोणते असा प्रश्न साहजिकच निर्माण होईल. उत्तर कोरिया, तुर्कमेनिस्तान, क्यूबा यांचा यात प्रामुख्याने समावेश आहे.




**राजकीय स्थिरता :** अनेक देशांमध्ये सरकार इंटरनेटला एक धोका म्हणून पाहतात. इंटरनेटमुळे लोकं जागृत होतात आणि सरकार विरोधी भावना पसरू शकतात. धार्मिक कारणे : काही देशांमध्ये धार्मिक कारणांसाठी इंटरनेटवर बंदी असते. त्यांना वाटते की इंटरनेटवर अशी माहिती उपलब्ध आहे जी त्यांच्या धार्मिक विश्वासांच्या विरोधात आहे.

काही देशांमध्ये सरकारला वाटते की इंटरनेटमुळे समाजात अराजकता पसरू शकते. काही देशांमध्ये इंटरनेटवर बंदी आहे, कारण त्यांना वाटते की इंटरनेटचा वापर दहशतवादी कारवायांसाठी होऊ शकतो. उत्तर कोरिया हा सर्वात कडक इंटरनेट नियम असलेला देश आहे. येथे इंटरनेटचा वापर फक्त सरकारच्या अधिकाऱ्यांपर्यंत मर्यादित आहे. तुर्कमेनिस्तानमध्येही इंटरनेटवर बंदी आहे, फक्त काही विशिष्ट वेबसाइट्सलाच प्रवेश मिळतो.

क्यूबामध्ये इंटरनेटचा वापर खूप मर्यादित आहे आणि त्यासाठी विशेष परवाना आवश्यक आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे लोकांना बाह्य जगातील घडामोडींबद्दल माहिती मिळणे कठीण होते. इंटरनेट शिकण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे शिक्षणावर परिणाम होतो. इंटरनेटचा वापर व्यापार आणि उद्योगांसाठी खूप महत्त्वाचा आहे. इंटरनेटवर बंदी असल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम होतो, अशी पार्श्वभूमी यामागे आहे.

## चीनी लोकांच्या आवडत्या इंडियन डिश

चीन आणि भारत दोन्ही देशांची संस्कृती वेगवेगळी. या दोन्ही देशांच्या खाद्यपदार्थांमध्येही बराच फरक आहे. तरी दोन्ही देश आवडीने एकमेकांच्या पदार्थ खातात. तसे पाहिले तर चायनीज म्हणताच अनेकांच्या तोंडाला पाणी सुटले असेल. अनेक लोक आवडीने चायनीज फूड खातात. कुणाला चायनीज राइस, चायनीज नूडल्स, चायनीज सूप असे एक ना दोन किती तरी पदार्थ आहेत.



जसे भारतात चायनीज मिळते, तसे चीनमध्ये भारतीय पदार्थ मिळतात. जसे भारतात चायनीज फूड आवडीने खातात तसे चीनमधील लोकांनाही भारतीय पदार्थ आवडतात. चिनी लोक भारतीय खाद्यपदार्थांची खूप कौतुक करतात. त्यांना मसालेदार आणि चविष्ट खायला आवडते. चीनमध्ये भारतीय पदार्थांची प्रसिद्धी वाढत आहे. बीजिंग, शांघाय, [illegible] बड्या शहरात भारतीय रेस्टॉरंट्सची संख्या वाढली आहे.

भारतातील समुद्री झिंगा मासा आणि इतर सी-फूड चिनींना खूप आवडते. चीनमध्ये हे आवडीने खाल्ले जाते. सध्या भारतातील अमृतसर कुल्चा चीनमध्ये लोकप्रिय आहे. भारतीय मिठाईसुद्धा चिनी लोकांना खूप आवडते. गुलाबजामुन, जिलेबी, रसगुल्ला या मिठायांचा यात समावेश आहे.

## आधार राखीव स्कायसूटचा

भारतातील काही निवडक ठिकाणी स्काय डायव्हिंगचा आनंद घेता येतो. स्कायडायव्हिंगमध्ये, हेलिकॉप्टरमधून किंवा डोंगरावरून उंचावरून उडी घेतली जाते, त्यावेळी पॅराशूट उघडते. त्यानंतर सेफ लँडिंगची प्रक्रिया सुरू होते. साधारणपणे, डायव्हर्स स्कायडायव्हिंगमध्ये ४००० मीटर उंचीवरून म्हणजे १२५० फूट उडी मारतात. अशावेळी पॅराशूट योग्य वेळी उघडले नाही तर स्कायडायव्हिंग करणे कठीण होऊ शकते. अनेकदा हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो की स्कायडायव्हिंग करताना पॅराशूट उघडले नाही तर डायव्हरचा जीव कसा वाचणार, हे महत्त्वाचे ठरते.



स्काय डायव्हिंगमध्ये, जेव्हा डायव्हर उंचावरून उडी मारतो. त्यामुळे बहुतांश स्कायडायव्हर्ससाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॅराशूट, पण कधी कधी स्कायडायव्हरचे पॅराशूट उघडत नाही. त्यामुळे अशा स्थितीत स्कायडायव्हरकडे एक राखीव पॅराशूट असते. राखीव पॅराशूट डायव्हरद्वारे स्वतः उघडले जाऊ शकते. जेव्हा मुख्य पॅराशूट उघडत नाही तेव्हा हे राखीव पॅराशूट अधिक विश्वासार्ह होण्यासाठी डिझाइन केलेले आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत हे पॅराशूट उघडता येते. त्यामुळे डायव्हरच्या जीवाला धोका नाही.

नवीन स्कायडायव्हर्स जेव्हा डायव्हिंग करायला जातात, तेव्हा त्यांना प्रशिक्षण दिले जाते. शिवाय, अनेकदा लोकांसोबत एक प्रशिक्षक देखील असतो, जो त्यांच्याबरोबर कोण उडी मारतो. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रशिक्षक आपत्कालीन परिस्थिती हाताळू शकतो. तो योग्य वेळी पॅराशूट उघडू शकता.

## पाण्यात वाढणारे फळ!



आपण कधी विचार केला आहे का की, असे कोणते फळ असेल जे पाण्यात वाढते आणि झाडावर नाही? हे ऐकून नक्कीच आश्चर्य वाटेल! पण असे एक फळ खरेच अस्तित्वात आहे. या वनस्पतीची पाने पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगतात, तर त्याची मुळे पाण्याखाली जमिनीत रुजलेली असतात. त्याचे वनस्पतीशास्त्रीय नाव आहे ट्रापा नटान्स, ज्याला आपण शिंगाडा म्हणतो. या इंग्रजीत वॉटर चेस्टनट म्हणतात. शिंगाडा हे एक अनोखे फळ आहे, जे तलावांमध्ये किंवा शांत पाण्याच्या प्रवाहांमध्ये वाढतं.

शिंगाड्याचं फळ एका विशिष्ट आकाराचे असते, जे बैलाच्या शिंगासारखं दिसतं. म्हणूनच त्याला शिंगाडा म्हणतात. या फळाचा बाहेरचा भाग काळा आणि कठीण असतो, तर आतील गर पांढरा आणि स्वादिष्ट असतो. भारतात शिंगाडा एक लोकप्रिय फळ आहे. उपवासादरम्यान याचा विशेष वापर केला जातो. याच्यापासून पीठ बनवले जाते, ज्याचा वापर विविध पदार्थ बनवण्यासाठी होतो. शिवाय, हे फळ पौष्टिक देखील आहे. त्यात प्रथिने, कार्बोहायड्रेट्स आणि खनिजे मुबलक प्रमाणात असतात. विचार करण्यासारखे हे आहे की, निसर्गाने कशी अद्भुत रचना केली आहे! आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या फळाची चव इतर फळांइतकीच गोड आणि पौष्टिक आहे.

## युक्ती...२८ कोटी जिंकण्यासाठी!

लॉटरी हा नशिबाचा खेळ असतो. एखाद्याला लागली तर त्याचे आयुष्यच बदलून जाते; अन्यथा अनेकांचे पैसे वाया जाऊ शकतात. चीनमध्येही एका व्यक्तीला लॉटरी लागल्यामुळे त्याचे पूर्ण आयुष्य बदलून गेले आहे. याचे कारण असे की, त्याला एक-दोन नाही तर चक्क २८ कोटी रुपयांची लॉटरी लागली आहे. तो अनेक वर्षांपासून लॉटरीचे तिकिट खरेदी करत होता, मात्र नशिबाची साथ त्याला मिळत नव्हती. यावेळी मात्र त्याने एक शक्कल लढवली व त्याला पहिले बक्षीस मिळाले. आता तो कोट्यधीश बनला आहे आणि सोशल मीडियावर आता त्याने नेमकी कोणती शक्कल लढवली, याची चर्चा सुरु झाली आहे.


चीनमधील एका व्यक्तीला एका युक्तीमुळे २४ मिलियन युआनची (अंदाजे २८ कोटी रुपये) लॉटरी लागली आहे. डबल कलर बॉल नावाच्या संस्थेने १० सप्टेंबरला विजेत्यांच्या नावांची घोषणा केली, तेव्हा त्याच्या कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. मध्य चीनमधील हेफेई प्रांतात राहणाऱ्या या चिनी व्यक्तीला पहिल्या क्रमांकाचे बक्षीस जाहीर झाले. यामुळे त्याची परिस्थिती पालटली. बक्षीस जाहीर झाल्यानंतर तो म्हणाला, 'गेल्या १० वर्षांहून अधिक काळ मी लॉटरीची तिकिटे घेत होतो, पण त्यासाठी कधीही २० युआनपेक्षा (अडीचशे रुपये) जास्त खर्च केला नाही. तिकिटे घेत असलो तरी कधी जॅकपॉट लागेल, अशी अपेक्षा केली नव्हती. खरेदी करण्याबरोबरच दानही केले पाहिजे असे मला वाटते. जिंकणे म्हणजे केवळ एक बोनस आहे.'



त्या चिनी व्यक्तीने सांगितले की, पहिल्यांदा लॉटरी खेळायला सुरुवात केली, तेव्हा आवडीचे क्रमांक घेत होतो. मग एकदा एका लॉटरी विजेत्याची गोष्ट वाचली. त्याने त्याच्या कुटुंबीयांच्या जन्मतारखांचा वापर करून तिकीट खरेदी केले होतं. तीच युक्ती त्यानेही वापरली व ११९ रुपयांचे तिकीट खरेदी केले. ते तिकीट त्याच्यासाठी नशीब बदलणारे ठरले. या युक्तीचा वापर तो २०१७ सालापासून करत होता, असे विजेत्या चिनी व्यक्तीने सांगितले. अखेर त्याची युक्ती कामी आली व त्याला आता २४ मिलियन युआन इतकी बक्षिसाची रक्कम मिळाली. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याने त्यापैकी ११ लाख रुपये दानही केले आहेत. लॉटरीचा खेळ म्हणजे संयमाची परीक्षा असते, पण बक्षीस मिळालं तर नशीब बदलून जाते; मात्र लॉटरी घेत असताना जॅकपॉटची अपेक्षा ठेवण्याऐवजी आपण समाजाप्रती काही बांधिलकी ठेवतो, याची जाणीव असावी, असे तो याबद्दल बोलताना म्हणतो.

## पुन्हा धोका वटवाघळांचा

वटवाघळं म्हणजे वेगवेगळ्या विषाणूंची जिवंत थैलीच असतात, असे म्हटले जाते व ते खरेही आहे. गेल्या काही वर्षांत कोरोनाने अवघ्या जगभरात धुमाकूळ घातल्याचं पाहायला मिळालं. 'सार्स-कोव्ह-२' हा 'कोव्हिड-१९' ला जबाबदार कोरोना विषाणूही वटवाघळामधूनच आला असे म्हणणारे अनेक लोक आहेत. कोरोनाची दहशत कमी होत असतानाच आता आणखी एक नवी समस्या दार ठोठावत आहे. वटवाघळांमुळे आता एक नवा विषाणु आफ्रिकेत फैलावलेला आढळला असून त्याचे नाव 'मारबर्ग' असे आहे.




डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, ९० टक्के रुग्णांसाठी तो घातक आहे. जगात आतापर्यंत ८ रुग्णांचा यामुळे मृत्यू झाला आहे.

या विषाणूमुळे रुग्णांना ताप, तोंडाची चव कमी होणे, तीव्र डोकेदुखी, अंगदुखी अशा समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच जुलाब, पोटात मुरड येणे, उलट्या आणि पोटदुखी यांसारखी लक्षणेही दिसतात. सध्या मारबर्ग विषाणू रवांडा, पूर्व आफ्रिकेत पसरला आहे. येथील परिस्थिती पाहून जागतिक आरोग्य संघटनेने आफ्रिकन देशांमध्ये त्याच्या धोक्याबाबत अलर्ट जारी केला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने मास्क घालण्याचा आणि सामाजिक अंतर राखण्याचा सल्ला दिला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रवांडामध्ये आतापर्यंत २६ प्रकरणांची पुष्टी झाली आहे. संघटनेच्या अहवालानुसार, हा संसर्ग रवांडाच्या ३० जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. २६ पैकी २० रुग्णांची प्रकृती चिंताजनक आहे. सध्या रवांडामधील रुग्णांना आयसोलेशनमध्ये ठेवण्यात आले आहे. याशिवाय संक्रमित लोकांच्या संपर्कात आलेल्या सुमारे १६० लोकांवर नजर ठेवण्यात येत आहे.



## एलियन्सचा पुरावा सापडला?



एलियनबाबत प्रत्येकालाच कुतूहल असते आणि बहुधा ते कायम राहणार. एलियन असतात आणि ते पृथ्वीवरील माणसांच्या संपर्कात असतात असे दावे केले जातात. अनेकदा ते विवादास्पद ठरतात पण तरी असे दावे सुरूच राहतात. सायमन हॉलंड नामक नासा फिल्म निर्मात्याने असाच एक दावा केला आहे. पृथ्वीवरील दुर्बिणींच्या मदतीने बुद्धिमान एलियनच्या अस्तित्वाचे अवशेष सापडल्याचा दावा हॉलंड यांनी केला आहे. सायमन हॉलंड हे बीबीसी आणि नासा यांनी आर्थिक सहकार्य केलेल्या प्रोजेक्टस्चा भाग म्हणून डॉक्युमेंट्रीज करतात. पृथ्वीवरील दुर्बिणींच्या मदतीने पृथ्वीबाहेर बुद्धिमान एलियनचे अस्तित्व सापडल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्या अस्तित्वाचे पुरावे एक महिन्याहून कमी काळात प्रसिद्ध केले जातील, असेही त्यांनी म्हटले आहे.

या शोधाबद्दल सांगताना हॉलंड म्हणाले, 'ऑक्सफर्डच्या सहकार्यातून सुरु असलेल्या एका कार्यक्रमाचा भाग म्हणून अलौकिक संकेतांचा शोध घेतला जात आहे. आपल्या आकाशगंगेतील मानवेतर बुद्धिमत्ता ओळखण्याची त्याची क्षमता आहे. हा संकेत म्हणजे रेडिओ तरंगांचा पाच तासांहून जास्त काळ चाललेला स्फोट होता. पृथ्वीपासून सुमारे ४.२ प्रकाशवर्षे दूर असलेल्या प्रॉक्सिमा सेंटॉरीच्या आसपास त्याची निर्मिती झाली असावी, असा अंदाज असल्याचे हॉलंड यांनी स्पष्ट केले. या संकेतांचे विश्लेषण करत असल्याचे ऑक्सफर्डकडून सांगण्यात आले आहे; मात्र त्याच्या संभाव्य स्रोताबाबत माहिती देण्यात आलेली नाही. 'डेलीमेल डॉट कॉम'शी बोलताना हॉलंड म्हणाले, ऑक्सफर्ड याबाबत अधिक संशोधन करत असल्यामुळे अधिक माहिती प्रकाशित करण्यास विलंब होत आहे. २९ एप्रिल २०१९ ला हा सिग्नल पहिल्यांदा नोंदवण्यात आला. तेव्हापासून तो नेहमीच चर्चेता विषय ठरला आहे. रेडिओ सिग्नल सध्या कमी प्रमाणात असल्याचं हॉलंड सांगतात.

ऑक्सफर्डच्या 'ब्रेक थ्रू लिसन' या ना नफा योजनेचा हवाला देऊन हॉलंड म्हणाले, सिग्नल अत्यंत हलक्या स्वरुपाचा आहे आणि त्याचा अभ्यास करताना अनेक तांत्रिक समस्या येत आहेत; मात्र हा सिग्नल एखाद्या एलियन प्रजातीकडून येत आहे, हे निश्चित आहे. हॉलंड पुढे म्हणाले, आम्हाला आपल्या आकाशगंगेत ऑक्टोबर २०२१ मध्ये एक मानवेतर बुद्धिमत्ता आढळली आहे. लोकांना अद्याप याबाबत माहिती नाही. या बुद्धिमत्तेकडून येणारा सिग्नल हा प्रॉक्सिमा सेंटॉरीच्या वरच्या भागातून येत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. यापूर्वी असे सिग्नल फॉल्स पॉझिटिव्ह असल्याचे स्पष्ट झाले; मात्र आता तसे नाही असे हॉलंड म्हणतात. हा सिग्नल हा ब्रह्मांडातील ध्वनीचा प्रतीध्वनी नाही तर एक संकीर्ण इलेक्ट्रोमॅग्नेटिक स्पेक्ट्रम होता, असा दावाही ते करतात. गुरुवारी त्यांनी सिग्नलचा स्रोत हा एकच बिंदू असल्याचा पुनरुच्चार केला. मानवेतर तांत्रिक हस्ताक्षर पुरावा सापडल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले.



'पृथाशक्ती'च्या भाग्यश्री टिळेकर यांचा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते 'पृथाशक्ती'च्या भाग्यश्री टिळेकर यांचा गौरव

नगर – केंद्रीय सहकार मंत्रालय अंतर्गत नाफेड मार्फ़त 'जागतिक सहकार वर्ष २०२५' साजरे करण्यासाठी 'सहकार से समृद्धी २०२५' हा कार्यक्रम राबविण्यात आला. यात देशातील सहकाराशी निगडीत सर्व घटकांना एकत्र बोलावून सहकाराच्या मंदिराशी जोडल्या गेलेल्या व सहकार क्षेत्रात गत काही वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या सर्वांचा केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान व केंद्रीय गृहमंत्री तसेच सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी पृथाशक्ती एफपीसीचे राज्यभरातील महिला एफपीसींसाठीचे व महिला सबलीकरण व सशक्तीकरणाचे कार्य लक्षात घेऊन भाग्यश्री टिळेकर यांचा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी गौरव करून सत्कार केला. कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आदी उपस्थित होते.

पृथाशक्ती एफपीसीच्या सहकार क्षेत्रातील कार्याची ही पोचपावतीच जणू मिळाली असून, पुढील वाटचालीसाठी अधिक प्रेरणा व उत्साह निर्माण झाला आहे. कृषि अर्थव्यवस्थेतील महिलांच्या सहभाग वाढीसाठी पृथाशक्ती एफपीसी कटिबद्ध असून, महिलांना खासगी बाजार व्यवस्था, अंतरराष्ट्रीय बाजारपेठ व एक्सपोर्ट तसेच प्रक्रिया उद्योगातील पायाभूत सुविधा अशा सर्व बाबींसह येत्या काळात पृथाशक्ती अधिक भक्कमपणे उभी राहील, असे भाग्यश्री टिळेकर म्हणाल्या.

# सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या मुळ पुरातन अवशेषांचे ३० जून रोजी अहिल्यानगरमध्ये होणार आगमन

## आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या पाईपलाईनरोड, गावडे मळा येथील ध्यान मंदिरात होणार दर्शनाचा लाभ





आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने सौराष्ट्र येथील सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या मूळ अवशेषांचे अहिल्यानगरमध्ये येत्या ३० जून रोजी आगमन होणार असून या सोहळ्याच्या नियोजन बैठकीत बोलताना मेघना मुनोत.

नगर – गुजरात येथील सौराष्ट्र येथील सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या मूळ अवशेषांच्या दर्शांचा लाभ नगरकरांना मिळणार आहे. ३० जून रोजी आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने पाईपलाईन रोड वरील गावडेमळा येथील ध्यान मंदिरात सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे मूळ अवशेष आणण्यात येणार आहे. येथे पूजा महाभिषेक झाल्यावर भाविकांसाठी हे दुर्लभ दर्शन मोफत उपलब्ध होणार आहे. भाविकांनी या सोहळ्याचा व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगरच्या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या मेघना मुनोत यांनी केले आहे.

सोहळ्याच्या नियोजनासाठी नुकतीच बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत मेघना मुनोत व भूषण मालू यांनी या सोहळ्याची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. यावेळी राजेंद्र पाचे, चंद्रकांत तागड, गौतम मुनोत, सुपर्णा देशमुख, सुनिता घाडगे, अर्चना पतंगे, जयश्री कोल्हे, पवन गांधी, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, विचार भारतीचे रवींद्र मुळे, सुधीर लांडगे, महेंद्र जाखेटे, विशारद पेटकर आदींसह नागरिक उपस्थित होते.

भूषण मालू म्हणाले, सौराष्ट्र येथील सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या मूळ मंदिरावर मुघलांनी अनेकदा हल्ले करून लुट करून ज्योतिर्लिंगाला अनेक वेळा खंडित केले होते. त्यावेळी तमीळनाडूच्या काही अग्निहोत्री पंडितांनी या ज्योतिर्लिंगाचे अवशेष जोपासले आणि शेकडो वर्ष या ज्योतिर्लिंगाची पूजा करत हे पवित्र रहस्य सुरक्षित ठेवले. हे पवित्र शिवलिंगाचे अवशेष नुकत्याच झालेल्या अलाहबाद कुंभमेळ्यात आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराचे प्रमुख श्री श्री रविशंकर महाराज यांच्याकडे शंकराचार्यांनी सुपूर्द केले आहेत. आता आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने देशातील सर्व भाविकांना या दुर्लभ शिवलिंगाचे दर्शन व्हावे यासाठी भारतभर नेण्यात येत आहेत. अहिल्यानगरमध्ये ३० जून रोजी हे शिवलिंग येणार आहे.

राजेंद्र पाचे म्हणाले, गावडे मळा आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ध्यान मंदिरात सायंकाळी या पवित्र सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या आवशेशांचे आगमन होणार आहे. या ठिकाणी सर्व नागरिकांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. येथे महारूद्राभिषेक पुजा झाल्यावर व सुरेल अशा सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहे. बंगलोर येथील आश्रमातून वेदविद्याभूषित पंडित व स्वामीजींच्या हस्ते सर्व पूजा संपन्न होणार आहेत.

नागरिकांनी या ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगरच्या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या डॉक्टर, नर्सेस व कर्मचारी यांच्यामार्फत सेवाभावी वृत्तीने सेवा

## उद्योजक पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; मोफत दंतरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन पेमराज बोथरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने करण्यात आले.

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल मधील दंतरोग विभाग अल्पावधीतच नावारूपाला आला आहे. गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी यांच्या कृपा आशीर्वादाने हॉस्पिटल–मध्ये मोठे सेवा कार्य सुरू आहे. हॉस्पिटलमध्ये डॉक्टर नर्सेस व कर्मचारी यांच्यामार्फत सेवाभावी वृत्तीने सेवा घडत आहे. पारस उद्योग समूहाच्या माध्यमातून सामाजिक कार्य, आरोग्य सेवा, शैक्षणिक कार्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष तथा पारस उद्योग समूहाचे प्रमुख पेमराज बोथरा यांनी केले आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन पेमराज बोथरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने करण्यात आले. याप्रसंगी डॉ.प्राची गांधी, डॉ. अर्पणा पवार, डॉ.तृप्ती डुंगरवाल, डॉ.अभिजीत सुराणा, डॉ.वसंत कटारिया, सतीश लोढा, डॉ. प्रकाश कांकरिया, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा, अभय गुगळे, डॉ.आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले, बोथरा परीवारा सारखे दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल चे सेवा कार्य प्रगतीपथावर आहे. सामाजिक कार्यात बोथरा परिवाराचे मोठे योगदान आहे. बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्षपदाची धुरा स्वीकारल्यानंतर पेमराज बोथरा यांच्या माध्यमातून समाजासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत. तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून आतापर्यंत पेमराज बोथरा, संतोष बोथरा व बोथरा परिवाराचे मोठे योगदान लाभले आहे. तसेच वर्धमान युनिव्हर्सिटी सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पालाही बोथरा परिवाराच्या माध्यमातून योगदान लाभत आहे. पारस उद्योग समूहाचा जागतिक स्तरावर मोठा नावलौकिक आहे.पारस उद्योग समूहाच्या देणगीतून मोठे सामाजिक कार्य उभे राहत आहे. महिन्यातून दोन वेळा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शिबिरे घेण्यात येत आहे. या शिबिराच्या माध्यमातून अनेक रुग्णांना दिलासा मिळत आहे.

डॉक्टर अर्पणा पवार म्हणाले, सोमवार ते शनिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दंतरोग विभागाची ओपीडी सुरू आहे. या विभागामार्फत आत्याधुनिक पद्धतीने मशीनरी च्या साह्याने चांगल्या पद्धतीने उपचार केले जातात. तसेच अत्यल्प दरात दात काढणे, मेटल कॅप्र, सिरॅमिक कॅप्र, रूट कॅनल, दातांची कवळी बसवणे, दातांमध्ये सिमेंट भरणे, इम्प्लांट आदी सुविधा येथे उपलब्ध आहेत.

शिबिरात १८० रुग्णांची मोफत दंतरोग तपासणी करण्यात आल्या. शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# रोहित मिस्किन यांना बोस्टनच्या विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्रदान



नगर – बोस्टन (अमेरिका) येथील ग्लोबल युनिर्व्हसिटीने येथील रोहित रमेश मिस्किन यांना पीएच. डी. प्रदान केली आहे. श्री. मिस्किन बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांनी बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन मॅनेजमेंट स्ट्रॅटेजीज इन इनोव्हेटिव्ह फायनान्सिंग ॲण्ड कॉस्टिंग दॅट सपोर्ट सस्टेनेबल रियल इस्टेट डेव्हलपमेंट इन इमर्जिंग सिटीज या विषयावर अत्यंत अल्प कालावधीत आपला प्रबंध सादर करून विशेष प्राविण्य मिळविले. नवी दिल्ली येथील छोटेखानी कार्यक्रमात श्री. मिस्किन यांनी पीएच. डी. प्रदान करण्यात आली.



आमदार गोपीचंद पडळकर यांनी सार्वजनिक कार्यक्रमात ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात केलेल्या चिथावणीखोर वक्तव्याचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.

# आ. गोपीचंद पडळकर यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) कडून निषेध

नगर – सांगलीचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सार्वजनिक कार्यक्रमात ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात केलेल्या चिथावणीखोर वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष दीपक निकाळजे यांच्या आदेशाने शहर जिल्हाध्यक्ष हरीश अल्हाट यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने या प्रकाराचा निषेध व्यक्त केला असून, ख्रिश्चन समाजाला जाहीर पाठिंबा दिला आहे. निवेदन देताना ख्रिश्चन धर्मगुरू रेवरेंट जे. आर. वाघमारे व रेवरेंट मार्टिन पारदे यांच्याकडे पाठिंबा दर्शवण्यात आला.

यावेळी युवक अध्यक्ष संदीप वाघमारे, किरण कांबळे, तरुण शिंदे, राहुल मुक्तीकर, संदीप पोळ, अतुल शिंदे, मनोज साळवे, लुकस क्षेत्रे, जयदेव देवडे, कुंदन भिंगारदिवे, नकुल क्षेत्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना हरीश अल्हाट म्हणाले, ख्रिश्चन समाजावर होणारे आरोप, अपमानास्पद वक्तव्य आणि त्यांच्याविरुद्ध हिंसक भाषा वापरणे हे केवळ धर्माच्या स्वातंत्र्याचा अपमान नाही, तर भारतीय संविधानाच्या मूलभूत मूल्यांचाही अवमान आहे. आमदार पदासारख्या जबाबदार स्थानावर बसून असा धार्मिक तेढ पसरवणारा माणूस लोकप्रतिनिधी होण्यास अपात्र आहे. त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून आमदारकी रद्द करण्यात यावी. पुढे बोलताना त्यांनी सांगितले, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारी सामाजिक न्यायासाठी लढणारी चळवळ आहे. आमचा पक्ष कोणत्याही प्रकारच्या धार्मिक द्वेषाला व हिंसक प्रवृत्तींना थारा देत नाही. ख्रिश्चन समाजावर अन्याय झाल्यास आम्ही त्यांच्यासोबत उभे राहू आणि शांतता, बंधुभाव, संविधानिक मूल्ये यांचा पुरस्कार करत अशा तत्वांच्या विरोधात रस्त्यावर उतरू.

# आ. गोपीचंद पडळकरांविरोधात ख्रिश्चन समाज आक्रमक



खिस्ती धर्मगुरुंना जीवे मारण्याची भाषा करणाऱ्या आमदार पडळकरांविरोधात तातडीने कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

नगर – सांगलीचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सार्वजनिक कार्यक्रमात ख्रिश्चन धर्मगुरूविरोधात केलेल्या चिथावणीखोर व हिंसक वक्तव्यावरून राज्यभरात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. ख्रिश्चन समाजाच्या विविध संस्था, चर्च, धर्मगुरू आणि नागरिकांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे निवेदन सादर करून पडळकरांविरुद्ध तात्काळ फिर्याद नोंदवण्याची व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आमदार पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंना ठार मारणाऱ्यास ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करून संविधान, कायदा आणि सामाजिक सलोख्यावर थेट आघात केला आहे. यामुळे राज्यातील ख्रिश्चन समाजात भयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ख्रिश्चन प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, अहिल्यानगर येथील धर्मांतराच्या कथित प्रकरणात आत्महत्या झालेल्या पीडितेबद्दल समाजाला सहानुभूती आहे, मात्र या घटनेच्या निमित्ताने संपूर्ण ख्रिश्चन समाजाला आरोपी ठरवणे हा गंभीर अन्याय आहे. धर्मांतरविरोधी मोर्चात ख्रिश्चन धर्माचे पवित्र प्रतीक 'क्रॉस'वर आक्षेपार्ह चिन्हे वापरण्यात आल्याची घटनाही निवेदनात नमूद करण्यात आली असून, संयोजकांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ख्रिश्चन समाजाच्या वतीने निवेदनात मागणी करण्यात आली आहे की, आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंना जिवे मारण्याचे जाहीर आवाहन करून समाजात धार्मिक तेढ निर्माण केली असून, त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. भारतीय दंड संहिता व लागू असलेल्या कायद्यानुसार त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अशा व्यक्तीस सार्वजनिक जीवनात स्थान नसल्यामुळे त्यांच्या आमदारकीची तात्काळ रद्द करावी. त्यांनी संविधानाच्या मूल्यांचा अवमान करत धार्मिक द्वेषाचे विष पेरले आहे. त्यामुळे केवळ निवेदन देऊन चालणार नाही, तर प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने ठोस कारवाई करावी, अशी मागणी ख्रिश्चन समाजाने केली आहे.

हे निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांना ही प्रत पाठवून कार्यवाहीची मागणी करण्यात आली आहे. यावेळी रेव्ह. जे आर वाघमारे, रेव्ह. रूपेश निकाळजे, रेव्ह. सतीश तोरणे, रेव्ह. सनी मिसाळ, पास्टर विजय काकडे, पास्टर जोसेफ वैरागर, प्रतीक बारसे, संजीव काकडे, नलिनी गायकवाड, प्रा. सॅम्युअल वाघमारे, संजय वाघमारे आदीं उपस्थित होते.

# चातुर्मासनिमित्त अनुप्रेक्षाजी म.सा यांचा ३० जूनला आगरकर मळातील जैन स्थानकामध्ये मंगल प्रवेश



नगर – ज्ञान गंगोत्री प्रभाकंवरजी म.सा. यांच्या सुशिष्या जिनशासन प्रभाविका अनुप्रेक्षाजी म.सा., स्वाध्याय प्रेमी श्रुतिप्रभाजी म.सा., सेवाभावी ऋजुप्रभाजी म.सा. आदि ठाणा ३ यांचा चातुर्मासनिमित्त आगरकर मळा जैन स्थानकामध्ये ३० जून रोजी मंगल प्रवेश होणार आहे.

यानिमित्त सक्कर चौकातील सचिन रतिलाल मुथ्या (मुथ्या मळा) येथून ३० जून रोजी सकाळी ९ वा. शोभा यात्रा निघून आगरकर मळा जैन स्थानकामध्ये आ. संग्राम जगताप व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थित प्रवेश होणार आहे.

कार्यक्रमासाठी सहपरिवार, संघ सहित उपस्थित राहण्याचे आवाहन श्री महावीर श्रावक संघाचे अध्यक्ष अभय कोठारी, सेक्रेटरी प्रमोद गादिया व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# दिव्यांगासाठीच्या राज्य सल्लागार मंडळाच्या जिल्हास्तरीय समितीवर ॲड. लक्ष्मण पोकळे



नगर – दिव्यांगासाठीच्या राज्य सल्लागार मंडळाच्या जिल्हास्तरीय समितीवर ॲड. लक्ष्मण पोकळे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तीचे सक्षमीकरण व पुनर्वसनाचे कार्य केले जाणार आहे.

दिव्यांगाच्या कल्याणासाठी निर्धारित केलेल्या ५% निधीच्या खर्चावर देखरेख ठेवणे व दिव्यांगाच्या सर्वांगीन विकासासाठी योजनेची कार्यक्रमाची अंमलबजावणी व दिव्यांगाच्या अधिनियमातील तरतुदीची जिल्हा प्रशासनाद्वारे अंमलबजावणी योग्य होते की नाही? यावर समिती लक्ष ठेवून दिव्यांगाच्या विकासासाठी काम करत आहे. सदर समितीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांची अशासकीय सदस्यपदी नियुक्ती झाली आहे.

यापूर्वी ही जिल्हा अपंग पुनर्वसन समितीवर व भारत सरकारच्या रेल्वे समितीवर देखील ॲड. पोकळे यांची नियुक्ती झालेली होती

# नगर जिल्ह्यातील उत्पादित मालाची निर्यात क्षमता वाढवण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा तयार करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया.

नगर – जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या साखर, दुग्धजन्य व अन्य मालाची निर्यात क्षमता वाढवण्यासाठी निर्यातदारांना प्रशिक्षित करत सर्वंकष कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चर कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी घेतला. या बैठकीस महाव्यवस्थापक दीपक शिवदास, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, उद्योग अधिकारी अशोक बेनके, श्याम बिराजदार, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री आणि ॲग्रीकल्चरचे प्रकाश गांधी, जागतिक बँक प्रकल्पाचे उप कार्यकारी अभियंता अभय भांगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे, उत्पादन शुल्क विभागाचे प्रवीणकुमार तेली, महाराष्ट्र मेकॅनिकल इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हरजीतसिंग वाधवा, आमी संघटनेचे अध्यक्ष श्री. खाकाळ यांच्यासह उद्योग मित्र संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. पंकज आशिया म्हणाले, 'एक जिल्हा, एक उत्पादन' या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील साखर व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादनांची क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. जिल्ह्यात कार्यरत असलेल्या अनेक फार्मर प्रोड्यूसर कंपन्यांना विदेश व्यापार महानिदेशालयामार्फत प्रशिक्षित करण्यात यावे. निर्यातीतील अडचणी सोडवण्यासाठी निर्यात मदत केंद्र उभारण्याचेही त्यांनी सूचित केले.

प्रशासन व उद्योजकांच्या समन्वयातून निर्यात क्षमतेस चालना देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

या बैठकीत औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची कामे, अनधिकृत स्टॉल हटवणे, पोलीस गस्त वाढवणे, अखंड व पुरेसा विद्युत पुरवठा, सनफार्मा ते निंबळक रस्त्याचे काम, ड्रेनेज स्वच्छता, कामगारांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आरोग्य सेवा, ई–बस सुविधा, नवीन सबस्टेशनची उभारणी, स्ट्रीट लाईट्स, भूखंड वाटप, निवासी क्षेत्र विकास, अग्निशमन यंत्रणा, राष्ट्रीयीकृत बँकेची उभारणी आदी विविध विषयांचाही आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला.

